# समर्थ शिक्षण

पुणे । वर्ष १ ले । अंक १ । ऑक्टोबर २०२४ । मासिक । पृष्ठ संख्या ४०











## शुभ दिपावली

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्युट संचलित

## समर्थ शैक्षणिक संकुल, बेल्हे (बांगरवाडी ), जुन्नर, पुणे

# संपादकीय मनोगत

" समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्युटचा **'समर्थ शिक्षण'** हा प्रथम अंक दीपावलीच्या शुभ मुहूर्तावर आपल्या हाती सोपविताना अतिशय आनंद होत आहे. ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार तांत्रिक शिक्षण मिळावे या उद्देशाने सन २००७ मध्ये कल्याण-नगर महामार्गावर बांगरवाडी-बेल्हे येथे समर्थ पॉलिटेक्निक तंत्रनिकेतन ची उभारणी केली. बदलत्या काळानुसार समर्थ संकुलामध्ये पॉलिटेक्निक, इंजीनिअरींग, आय.टी.आय., फार्मसी, मॅनेजमेंट, लॉ कॉलेज, पॅरामेडीकल, नर्सिंग, ज्युनिअर कॉलेज, सी.बी.एस.इ. स्कूल, कॉम्प्युटर सायन्स, आयुर्वेदिक हॉस्पिटल यासारख्या विविध अभ्यासक्रमांची महाविद्यालय व संस्था कार्यरत आहेत.

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्युटच्या संचालक मंडळाच्या संकल्पनेतून आपण समर्थ शिक्षण हा प्रथम अंक प्रकाशित करत आहोत. **Think Globally Act Locally** या विचारसरणी प्रमाणे संचालक मंडळ जागतिक स्तरावर विचार करून स्थानिक पातळीवर नवनवीन योजना राबविण्याचा प्रयत्न करत असतात.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर मार्गदर्शन विविध क्रीडा स्पर्धा, सण-उत्सव, तंत्रज्ञान कार्यशाळा, पर्यटन कार्यशाळा, माजी सैनिक सन्मान, महाआरोग्य शिबिर, व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा, किल्ले बनविणे स्पर्धा, योग प्रशिक्षण यासारखे विविध कार्यक्रम राबविले जातात.

समर्थ शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी आज अनेक देश-विदेशामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. समर्थ शैक्षणिक संकुलास आजपर्यंत विविध पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे. भविष्यकाळात उत्तमोत्तम आधुनिक सुविधा निर्माण करून जास्तीत जास्त दर्जेदार विद्यार्थी घडविण्याचा संस्थेचा मानस आहे.

समर्थ संकुलाची यशोगाथा **'समर्थ शिक्षण'** या मासिक अंकाच्या रूपाने प्रकाशित करत असताना संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ यांचे विशेष सहकार्य लाभले. प्रस्तुत अंकाच्या निर्मितीमध्ये अनेकांनी मोठ्या उत्साहाने सहकार्य केले त्या सर्वांचे **मनःपूर्वक आभार...!** "



# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | किल्ले बनवा स्पर्धा | ४ |
| २. | किरण ॲकॅडमीमध्ये १० विद्यार्थ्यांची निवड | ५ |
| ३. | राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धा | ६ |
| ४. | शारदीय नवरात्रौत्सव व खंडेनवमी | ७ |
| ५. | राज्यस्तरीय तांत्रिक प्रश्नमंजुषा | ८ |
| ६. | जागतिक हृदय दिन | ९ |
| ७. | एम्बेडेड सिस्टम विषयावर कार्यशाळा | १० |
| ८. | योगासन स्पर्धा | ११ |
| ९. | भोंडल्याचा कार्यक्रम | १२ |
| १०. | ७ वी चरक सुश्रुत व्याख्यानमाला | १३ |
| ११. | अभियंता दिन | १४ |
| १२. | टोयोटा कौशल्य स्पर्धा | १५ |
| १३. | जागतिक पर्यटन दिन | १६ |
| १४. | जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा | १७ |
| १५. | तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा | १८ |
| १६. | आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन | १९ |
| १७. | तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा | २० |
| १८. | आई वडील शिक्षकांना विसरू नका-प्रा.रतिलाल बाबेल | २१ |

| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १९. | खो-खो, बुद्धिबळ स्पर्धा | २२ |
| २०. | पर्यावरणपूरक गणेशमुर्ती | २३ |
| २१. | इंडस्ट्रीयल रोबोटिक्स विषयावर कार्यशाळा | २४ |
| २२. | सिरमा एस.जी.एस. टेक्नॉलॉजी कंपनीत विद्यार्थ्यांची निवड | २५ |
| २३. | टोयोटा करिअर डे निमित्त विद्यार्थ्यांची निवड | २६ |
| २४. | एच.डी.एफ.सी. बँकेत निवड | २७ |
| २५. | कुस्ती स्पर्धेत यश | २८ |
| २६. | माजी सैनिक सन्मान सोहळा | २९ |
| २७. | क्यू स्पायडर कंपनीमध्ये विद्यार्थ्यांची निवड | ३० |
| २८. | सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन | ३१ |
| २९. | शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा | ३२ |
| ३०. | सकारात्मक दृष्टिकोन हीच यशाची गुरुकिल्ली-अनिल गुंजाळ | ३३ |
| ३१. | नवीन शैक्षणिक धोरण | ३४ |
| ३२. | सन्मान गुरुजनांचा | ३५ |
| ३३. | ब्रेम्बो ब्रेक्समध्ये विद्यार्थ्यांची निवड | ३६ |
| ३४. | फार्मसीच्या विद्यार्थ्यांची निवड | ३७ |
| ३५. | रतन टाटांना भावपूर्ण श्रद्धांजली | ३८ |

# समर्थ गुरुकुल,बांगरवाडी (बेल्हे)




## शासकीय तालुकास्तरीय जागतिक वारसा नामांकन किल्ले बनवा स्पर्धेत समर्थ गुरुकुल प्रथम

यूनेस्को कडे प्रस्तावित जागतिक वारसा नामांकनासाठी पुणे जिल्ह्यातील शिवनेरी,लोहगड आणि राजगड या तीन किल्ल्याची निवड करण्यात आली आहे, या किल्ल्याच्या प्रचार,प्रसार आणि जनजागृती करीता जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांच्या वतीने जिल्हा व तालुका स्तरीय किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या तालुकास्तरीय किल्ले बनवा स्पर्धाचा निकल नुकताच जाहीर करण्यात आला असून या स्पर्धा मध्ये समर्थ गुरुकुल बेल्हे या शाळेने प्रथम क्रमांक मिळविला असल्याची माहिती तालुका समिती अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी जुन्नर आंबेगाव श्री. गोविंद शिंदे आणि सचिव तथा गट शिक्षण अधिकारी श्रीम.अनिता शिंदे यांनी दिली.

या स्पर्धेमध्ये जुन्नर तालुक्यातील एकूण ३४ शाळा सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक स्पर्धकाने ३ मिनिट कालावधीचे सादरीकरण करावयाचे होते. या स्पर्धेत समर्थ गुरुकुल बांगरवाडी बेल्हे यांनी प्रथम क्रमांकाचे १,००,००० रुपये, जि. प. शाळा वडगाव आनंद द्वितीय क्रमांकचे ५०,००० रुपये तर जि.प. शाळा इनामवाडी कुसुर यांना तृतीय क्रमांकाचे २५,००० चे बक्षीस जाहीर झाले आहे, त्याचबरोबर शिवंजली विद्या निकेतन चाळकवाडी यांनी चतुर्थ तर महालक्ष्मी विद्यालय उंब्रज यांनी पाचवा क्रमांक मिळवला आहे. या पांच गावांना ग्राम विकास करिता प्रत्येकी ५० लक्ष रुपये इतके अनुदान जिल्हा नियोजन समिती मार्फत देण्यात येणार आहे. तसेच जिल्हा स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत ही बक्षीस जिंकण्याची संधी आहे. या स्पर्धेचे परीक्षण करीता मा. डॉ. सुनील शेळके तहसीलदार, मा.सचिन सूर्यवंशी गटविकास अधिकारी, मा. रविंद्र चौधर उपविभागीय पोलिस अधिकारी, श्री. संदीप भोळे मुख्याधिकारी नगर परिषद जुन्नर, श्री.सचिन मुंढे नायब तहसीलदार यांनी कामकाज पाहिले. श्री.यश मस्करे यांनी स्पर्धा समन्वयक म्हणून कामकाज पाहिले.

**प्रथम क्रमांक**
**१ लक्ष रुपयांचे बक्षीस**

# समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट,बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थ अभियांत्रिकीच्या १० विद्यार्थ्यांची 'किरण अकॅडेमी' या कंपनीमध्ये निवड

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्युट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट,बेल्हे या अभियांत्रिकी महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांची 'दि किरण अकॅडमी' या कंपनीमध्ये निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी दिली. कॅम्पस ड्राईव्ह २०२४ अंतर्गत 'किरण अकॅडमी' या कंपनीच्या वतीने कॉम्प्यूटर, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, बीसीए, एमसीए, एमसीएस विद्यार्थ्यांसाठी मुलाखतीचे आयोजन नुकतेच समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट,बेल्हे या महाविद्यालयात करण्यात आले होते. 'किरण अकॅडमी' ही लोकप्रिय सॉफ्टवेअर प्रशिक्षण देणारी संस्था आहे. इंडस्ट्री आणि इन्स्टिट्यूट यांमधील गॅप भरून काढण्यासाठी कालानुरूप बदलणाऱ्या तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे व प्रशिक्षण देणे हा या संस्थेचा हेतू आहे. या संस्थेच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना जाव्हा फुल स्टॅक, सॉफ्टवेअर टेस्टिंग, पायथॉन फुल स्टॅक आदी प्रकारच्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. विविध मल्टीनॅशनल कंपन्यासाठी लागणारे मनुष्यबळ पुरवण्याचे काम ही संस्था करते. कंपनीच्या वतीने नवम तिवसकर यांनी मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण केली. त्यामध्ये सकाळच्या सत्रामध्ये सर्व विद्यार्थ्यांची लेखी परीक्षेद्वारे कल चाचणी घेण्यात आली. त्यानंतर सांघिक चर्चा व व्यक्तिमत्त्व विकासावर आधारित मुलाखत घेण्यात आली. संवाद कौशल्य, सांघिक भावना, विश्लेषणात्मक विचारांची ओळख, सॉफ्ट स्किल ज्ञान आणि विषयाबाबतचे ज्ञान या घटकांचा विचार करून विद्यार्थ्यांची निवड केल्याची माहिती नवम तिवसकर यांनी दिली.

अंतिम टप्प्यातील मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांचे तांत्रिक कौशल्ये, विशेषज्ञता, सॉफ्ट स्किल्स आणि प्रस्तावित पदांसाठी त्यांची एकूण पात्रता तपासली गेली. या मुलाखतींमध्ये सखोल चर्चा आणि व्यक्तिमत्व मूल्यांकनासाठी भरपूर संधी उपलब्ध करून देण्यात आली.त्याच दिवशी मुलाखतींचे निकाल जाहीर करण्यात आले आणि १० उत्कृष्ट उमेदवारांची 'किरण अकॅडमी' च्या वतीने विविध अभ्यासक्रमांच्या इंटर्नशिप आणि प्लेसमेंट साठी निवड करण्यात आली.

निवड झालेले विद्यार्थी पुढील प्रमाणे:

सिद्धांत वाकचौरे, ऋतुजा धुमाळ, निशिगंधा पिंगट, दीक्षा कुलकर्णी, साक्षी थोरात, मानसी भोर, पायल पाडेकर, कल्याणी पवार, प्रद्युम्न भोर, तुषार शिंदे.

सदर मुलाखतीचे यशस्वी नियोजन करण्यासाठी कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख प्रा.स्नेहा शेगर,ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा.सचिन पोखरकर यांनी परिश्रम घेतले.



# समर्थ फार्मसी महाविद्यालयात चौथी राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धा संपन्न, महाराष्ट्रातून ३१८ विद्यार्थ्यांचा उस्फुर्त सहभाग

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्युट संचालित समर्थ इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी आणि समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हे या महाविद्यालयांमध्ये इंडिअन फार्मास्युटिकल असोसिएशन आळेफाटा लोकल युनिट च्या अंतर्गत राज्यस्तरीय ४ थी पोस्टर स्पर्धा नुकतीच पार पडली. 'औषधनिर्माणशास्त्र विज्ञानातील उदयोन्मुख ट्रेंड' या विषयानुरुप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या या स्पर्धेत १५ महाविद्यालयातून तब्बल ३१८ विद्यार्थ्यांनी आपला उस्फुर्त सहभाग दर्शविला. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि सरस्वती प्रतिमापूजनाने झाली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्युटमधील रिसर्च आणि इनोव्हेशन सेलचे संचालक डॉ.प्रतिक मुणगेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पोस्टर प्रदर्शन मूल्यमापन करताना लक्षात घेतल्या जाणाऱ्या गोष्टी त्यांचे अनुभव आणि विद्यार्थ्यांना पोस्टर प्रदर्शन कसे करावे याबद्दल त्यांनी विशेष मार्गदर्शन केले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:

डी फार्मसी : प्रथम क्रमांक : अनुजा जोगडे, साक्षी फुले (समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, बेल्हे)

द्वितीय क्रमांक : सृष्टी बाणखेले, आदिती महाडिक (विशाल इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी,आळे)

तृतीय क्रमांक-शुभांगी शिंदे, ऐश्वर्या मोढवे (शिवनेरी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,खानापूर)

बी. फार्मसी : प्रथम क्रमांक-हृतिक नळे,अजिंक्य ठाकरे (संदिप इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस, नाशिक)

द्वितीय क्रमांक : सायली छेडे,अनम मोमीन (समर्थ इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी,बेल्हे), साक्षी पाटील (PRES इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी,लोणी)

तृतीय क्रमांक : अभिषेक कोळी,सानिका साळुंखे (समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, बेल्हे), किरण यादव, रुत्विक वानुरे (विशाल इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी,आळे)

एम. फार्मसी : ऋतुजा भायगुडे (काशीबाई नवले कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे) यांना देण्यात आला.

विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके,जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांच्या हस्ते रोख रक्कम,सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन करण्यात आला.

# समर्थ औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आय.टी.आय.) बांगरवाडी (बेल्हे)



## समर्थ शैक्षणिक संकुलात शारदीय नवरात्रौत्सव व खंडेनवमी निमित्त यंत्र पूजन

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्युट राजुरी संचलित समर्थ औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आय.टी.आय.) येथे शारदीय नवरात्रौत्सव व खंडेनवमीनिमित्त भारतीय परंपरेनुसार यंत्र पूजन व शस्त्र पूजन करण्यात आले. संकुलातील आय.टी.आय. विभागाबरोबरच इंजिनीअरींग, पॉलिटेक्निक, एमबीए, ज्युनिअर कॉलेज, बीसीएस गुरुकुल, फार्मसी, लॉ, बीबीए, बीसीए, एमसीए, एम.सी.एस., समर्थ टाटा मोटर्स, समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल,विभागीय प्रशिक्षण व कौशल्य विकास केंद्र आदी सर्वच विभागांमध्ये ही यंत्र औजारे यांची पूजा मोठ्या आनंदाने व विधीपूर्वक करण्यात आली.

संस्थेचे उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके यांच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने व यंत्र पूजन करून खंडेनवमी साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल ताई शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, आय.टी.आय.चे प्राचार्य पांडुरंग हाडवळे, उपप्राचार्य विष्णू मापारी, बीसीएसचे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार, डॉ.लक्ष्मण घोलप, समर्थ इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.बसवराज हातपक्की, समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.संतोष घुले, पॉलिटेक्निकचे प्राचार्य अनिल कपिले, टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले, अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे, समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलचे डॉ.राजेंद्र निचित, प्रा.संजय कंधारे, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदिप गाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

भारतीय धर्मपरंपरेनुसार नऊ दिवसांचा नवरात्र उत्सव पूर्ण होतो. खंडे नवमीला यंत्र,औजारे,शस्त्रपूजन केले जाते. वैद्य डॉक्टरांपासून ते कुशल कारागीरांपर्यंत असे पारंपारिक व्यवसायातील लोक दररोजच्या उपयोगात शस्त्रांची पूजा केली जाते. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त म्हणून दसऱ्याच्या मुहूर्तावर नवी खरेदी,नवे करार,नव्या योजनांचा प्रारंभ इ.चांगल्या गोष्टीची सुरुवात केली जाते. घर,गाडी,बंगला खरेदी केला जातो. सोन्या चांदीचे दागिने केले जातात. नवे व्यवसाय चालू केले जातात. नवी नाटके,चित्रपट यांचे मुहूर्त होतात. पुस्तके प्रकाशित होतात.

सर्व विद्यार्थ्यांनी,शिक्षकांनी व उपस्थित मान्यवरांनी यावेळी यंत्र अवजारे व शस्त्रांची पूजा केली. यंत्रासमोर आकर्षक अश्या आणि ज्वलंत विषयावर भाष्य करणाऱ्या बोलक्या रांगोळ्यांनी मान्यवरांचे लक्ष वेधून घेतले.

# समर्थ पॉलिटेक्निक, बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थ पॉलिटेक्निक मध्ये राज्यस्तरीय तांत्रिक प्रश्नमंजुषा संपन्न

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट राजुरी संचलित समर्थ पॉलिटेक्निक बेल्हे (बांगरवाडी) येथे नुकतेच राज्यस्तरीय तांत्रिक प्रश्नमंजुषा व भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध विद्यालयातील सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. प्रमुख पाहुणे म्हणून एल अँड टी प्रिसिजन इंजिनिअरिंग सिस्टीम तळेगाव येथील सीनियर डेप्युटी जनरल मॅनेजर आनंद कुलकर्णी तसेच डेप्युटी जनरल मॅनेजर गोरखनाथ औटी उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन वैज्ञानिक व नाविन्यपूर्ण असावा. विद्यार्थ्यांनी नेहमी स्वतःशी स्पर्धा करावी व प्रत्येक वेळी आपल्यामधील उणिवा दुर करून परिपूर्ण बनावे असे यावेळी आनंद कुलकर्णी म्हणाले. ही स्पर्धा सिव्हिल इंजिनिअरिंग, मेकॅनिकल अँड मेकॅट्रॉनिक्स, कॉम्प्युटर अँड आयटी, इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन आणि अप्लाइड सायन्स अशा सहा ग्रुप मध्ये घेण्यात आली.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

विज्ञान प्रश्नमंजुषा (प्रथम वर्ष):- प्रथम क्रमांक-समृद्धी सोनवणे (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे )

द्वितीय क्रमांक-तनुजा वाबळे (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे)

तृतीय क्रमांक-अनुराग दांगट आणि सिद्धेश औटी (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे)

(तांत्रिक प्रश्नमंजुषा): सिव्हिल इंजिनिअरींग ग्रुप: प्रथम क्रमांक-कृष्णराज मंडलिक आणि वैभव पवार (अमृतवाहिनी पॉलिटेक्निक, संगमनेर)

द्वितीय क्रमांक-सलोनी ढेरंगे आणि सानिका शेरकर (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे)

तृतीय क्रमांक-श्रवण औटी (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे)

तांत्रिक प्रश्नमंजुषा: कॉम्प्युटर ग्रुप- प्रथम क्रमांक-सोहम शिंदे आणि ओमकार भोर (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे)

द्वितीय क्रमांक-नंदिनी चित्ते आणि लीना गुंजाळ (अमृतवाहिनी पॉलिटेक्निक,संगमनेर),

तृतीय क्रमांक-सुरभी जाधव आणि खटाळे वैष्णवी (अमृतवाहिनी पॉलिटेक्निक, संगमनेर)

तांत्रिक प्रश्नमंजुषा : मेकॅनिकल ग्रुप- प्रथम क्रमांक-अनिकेत गुंजाळ (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे)

द्वितीय क्रमांक-साहिल मुळे (समर्थ पॉलिटेक्निक,बेल्हे)

तृतीय क्रमांक-यश चिंचवडे (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे)

तांत्रिक प्रश्नमंजुषा : इलेक्ट्रीकल ग्रुप-प्रथम क्रमांक-शंतनु बाळसराफ आणि निखिल मुंढे (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे), तृतीय क्रमांक-ऋषिकेश रासकर आणि अभिषेक झिंजाड (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे), तृतीय क्रमांक-ऐश्वर्या मगर (अमृतवाहिनी पॉलिटेक्निक, संगमनेर)

पोस्टर प्रेसेंटेशन-भित्तिपत्रक प्रदर्शन स्पर्धा

प्रथम क्रमांक-अक्षदा कोटकर आणि मानसी जाधव (अमृतवाहिनी पॉलिटेक्निक,संगमनेर), द्वितीय क्रमांक-गौरी लोहटे (गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक अवसरी), तृतीय क्रमांक-ज्ञानेश पाडेकर (समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे) उत्तेजनार्थ-गोकुळ महाजन आणि ऋतुराज थोरात (एस.पी.आय.टी. पॉलिटेक्निक कुरुंद)

बक्षीसपत्र विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक,सन्मानचिन्ह आणि ५० हजार हून अधिक रोख रकमेची पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आली.

# समर्थ इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग, बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थच्या नर्सिंग कॉलेजमध्ये जागतिक हृदय दिन साजरा 'सहभागी व्हा जागरुकता वाढवा': नर्सिंग इन्स्टिट्युट मार्फत संदेश

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग,बेल्हे (बांगरवाडी) यांच्या वतीने समर्थ शैक्षणिक संकुलामध्ये नुकताच जागतिक हृदय दिन साजरा करण्यात आला. जागतिक हृदय दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना शालेय आणि महाविद्यालयीन जीवनामध्येच आपल्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी म्हणून मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हृदया संदर्भात असलेल्या अनेकविध विकारांची माहिती तसेच इलाजापेक्षा प्रतिबंध बरा त्यामुळे हृदयविकार होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन डॉ. रमेश पाडेकर यांनी केले. आपण काय खातो आणि पितो, किती व्यायाम करतो आणि तणावाचे व्यवस्थापन कसे करतो यावर आपल्या हृदयाचे आरोग्य अवलंबून आहे.

हृदयविकारासंबंधीत जनजागृती करण्याचा दिवस म्हणून २९ सप्टेंबर हा दिवस दरवर्षी जगभरामध्ये साजरा करतात. या दिवसाला जागतिक हृदय दिवस असे संबोधतात. या उपक्रमामध्ये हृदयविकारासाठी प्रतिबंधात्मक उपाय आणि या विकाराचा जागतिक पातळीवर होणारा परिणाम यांचा समावेश होतो.

जागतिक हृदय संघटना आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक हृदय दिवसाला मान्यता मिळालेली आहे. जागतिक आकडेवारीनुसार हृदयविकार हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे. अधिक तर व्यक्ती हृदयविकाराचा झटका आल्याने मरण पावतात. असंतुलित आहार, व्यायामाची कमतरता, धूम्रपान, मधुमेह, उच्च रक्तदाब, स्थूलता, हवा प्रदूषण ही हृदयविकाराची महत्त्वाची कारणे असल्याचे यावेळी डॉ.राजेंद्र निचित म्हणाले. संतुलित वजन,निरोगी हृदयासाठी आवश्यक जीवनशैली तसेच व्यवसायाच्या ठिकाणी हृदय निरोगी राखण्यासाठी पूरक वातावरण निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण बाबींवर यावेळी लक्ष केंद्रीत करण्यात आले.

यावेळी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी रॅलीमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला व सदर कार्यक्रमात रॅली,पथनाट्य व गिते सादर करून हृदयविकारासंदर्भात जनजागृती करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत आदी मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# समर्थ पॉलिटेक्निक, बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थ पॉलिटेक्निक मध्ये तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन एम्बेडेड सिस्टीम व इंटरनेट ऑफ थिंग्स या विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे या तंत्रनिकेतन महाविद्यालयात नुकतेच तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग व मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींग विभागाच्या वतीने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. ओबी एनर्जी रिसर्च एंटरप्राइजेस या समूहाचे संस्थापक संभाजी कदम हे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले, पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.अनिल कपिले, प्रा.संजय कंधारे, सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या तीन दिवसीय कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना एम्बेडेड सिस्टीम आणि इंटरनेट ऑफ थिंग्स म्हणजे काय, त्याचा वापर कसा व कुठे करावा याबद्दलचे मार्गदर्शन करण्यात आले. इलेक्ट्रॉनिक्स ऑटोमेशन संबंधित इलेक्ट्रॉनिक उपकरणे व किट यामध्ये एम्बेडेड सिस्टीमचा वापर कसा केला जातो याबाबत चे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना देण्यात आले. आरडीनो सॉफ्टवेअर बाबतचे मूलभूत आणि प्रगत तंत्रज्ञान यांचा वापर कसा करावा,आरडीनो संलग्न उपकरणे ड्रायव्हिंग एलईडी, एलसीडी,रिले,कीबोर्ड यांची इंटरफेसिंग कशी करावी याचे सखोल मार्गदर्शन सहभागी विद्यार्थ्यांना करण्यात आले.

सदर कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी मेकॅटॉनिक्स व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरींग विभागाच्या प्रा.संदीप त्रिभुवन, प्रा.शिल्पा वाजे, प्रा.प्रणाली थोरात, प्रा.भाग्यश्री शेळके यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेकॅटॉनिक्स इंजिनिअरींग विभागप्रमुख प्रा.श्याम फुलपगारे यांनी तसेच प्रास्ताविक समर्थ पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.अनिल कपिले यांनी तर आभार इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग विभागप्रमुख प्रा.आदिनाथ सातपुते यांनी मानले.

# समर्थ गुरुकुल,बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थ मधील जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत ३२४ खेळाडूंचा सहभाग
## समर्थ गुरुकुलच्या ३ विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा कार्यालय,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे नुकतीच संपन्न झाली. १४,१७ व १९ वर्षे मुले आणि मुली यांच्या योगासना स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. जिल्ह्यातून एकूण ३२४ खेळाडू या स्पर्धेसाठी सहभागी झाले होते. समर्थ गुरुकुल मधील प्रीतम आंधळे याने रिदमिक योगा मध्ये प्रथम क्रमांक मिळविला. साई दिघे ट्रॅडीशनल योगा स्पर्धेत तृतीय तर गौरी चौधरी हिने चतुर्थ क्रमांक पटकावला. या तीनही विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याची माहिती समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे व क्रीडा संचालक एच.पी. नरसुडे यांनी दिली.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :-

१४ वर्ष मुली- प्रथम क्रमांक-राधा गावडे (बारामती)
रिदमिक योगा-प्रथम क्रमांक-संस्कृती जाधव (बारामती)
आर्टिस्टिक योगा-प्रथम क्रमांक-प्रणिता जाधव (बारामती)
१७ वर्ष मुली-प्रथम क्रमांक-पुष्पपाल जगताप (बारामती)
रिदमिक योगा-प्रथम क्रमांक-माहीका पटवर्धन (मुळशी)
आर्टिस्टिक योगा-प्रथम क्रमांक-पुष्पलाल जगताप (बारामती)
१९ वर्ष मुली-प्रथम क्रमांक-वैष्णवी बारस्कर (बारामती)
रिदमिक योगा- प्रथम क्रमांक-साई कुलकर्णी (मुळशी)
आर्टिस्टिक योगा- प्रथम क्रमांक-वैष्णवी बावस्कर (बारामती)
१४ वर्ष मुले-प्रथम क्रमांक-आरुष कवळेकर (मावळ)
आर्टिस्टिक योगा-प्रथम क्रमांक-स्वराज चौधरी (जुन्नर)
रिदमिक योगा-प्रथम क्रमांक-मेधांश बहादूर (मुळशी)
१७ वर्ष मुले-प्रथम क्रमांक-रेवणसिद्धी कोरे (मावळ)
रिदमिक योगा-प्रथम क्रमांक-प्रीतम आंधळे (जुन्नर)
आर्टिस्टिक योगा-प्रथम क्रमांक-हर्षद काळे (बारामती)
१९ वर्ष मुले-प्रथम क्रमांक-ओम मरकड (मावळ)
आर्टिस्टिक योगा-प्रथम क्रमांक-लौकिक गडाडे (बारामती)
रिदमिक योगा-प्रथम क्रमांक-मल्हार भुजबळ (जुन्नर)

स्पर्धांचे यशस्वी संयोजन करण्यासाठी समर्थ शैक्षणिक संकुलाचे क्रीडा संचालक एच.पी. नरसुडे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षक डॉ.राजाभाऊ ढोबळे, सुरेश काकडे, किर्ती थोरात, ज्ञानेश्वर जाधव, समर्थ गुरुकुलच्या दिपाली नवले, अक्षता गुंजाळ, स्नेहल ढोले, पल्लवी शिंदे, दीप्ती चव्हाण यांचे सहकार्य मिळाले. सर्व यशस्वी व सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांनी अभिनंदन केले.

# समर्थ गुरुकुल,बांगरवाडी (बेल्हे)



## समर्थ गुरुकुल मध्ये रंगला भोंडल्याचा कार्यक्रम

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल, बेल्हे या सीबीएसई मान्यताप्राप्त इंग्लिश माध्यमाच्या शाळेमध्ये नुकताच शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त संकुलातील महिलांनी भोंडल्याचा कार्यक्रम साजरा केला. सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविणारा भोंडला अनादी काळापासून चालत आलेल्या भारतीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचे काम करतो. समर्थ गुरुकुलच्या प्रांगणात मधोमध हत्तीची प्रतिमा काढून त्याची पूजा करत फेर धरून ऐलमा पैलमा, कारल्याचा वेल,श्री कांता कमल कांता अशा वैविध्यपूर्ण गाण्यांनी भोंडला खेळ खेळण्यात आला. भोंडल्या विषयी माहिती सांगताना माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके म्हणाल्या की आश्विन महिन्यात हस्त नक्षत्राला सुरुवात होते त्या दिवसापासून हदग्याची किंवा भोंडल्याची सुरुवात होते. भोंडला हा पश्चिम महाराष्ट्रात व कोकणात प्रचलित असलेला स्त्रियांच्या सामुदायिक खेळाचा प्रकार आहे. नवरात्रीचे नऊ दिवस आणि दसऱ्याच्या दिवशी हा खेळला जातो. भोंडल्याची विविध गाणी मुखोद्‌गत असल्याने त्यांच्या मुखातून सुंदर चालीसह ती गीते ऐकताना उपस्थित महिला व विद्यार्थी-विद्यार्थिनी तल्लीन झाल्या होत्या. हादग्याचा फेर धरण्यापूर्वी मध्यभागी पाटावर हत्तीची रांगोळी काढून त्याच्याभोवती सजावट केली गेली व सहभागी झालेल्या महिला व विद्यार्थिनी त्या हत्तीला नमस्कार करून भोंडल्याच्या खेळात सहभागी होत होत्या.

गुरुकुलच्या शिक्षकांनीदेखील भोंडल्याची पारंपारिक गाणी म्हणत विद्यार्थ्यांबरोबर फिरत भोंडल्याचा आनंद लुटला. ठेका,ताल,लयबद्ध अशा आनंदी व उत्साहाच्या वातावरणात भोंडल्याचा खेळ चांगलाच रंगात आला होता. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी सांस्कृतिक विभागा मार्फत स्नेहल ढोले, रूपाली भांबेरे, वैशाली सरोदे तसेच इतर सर्व शिक्षक सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, सारिकाताई शेळके, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशालीताई आहेर, मीराताई शेळके, संगीताताई शेळके, गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली सरोदे यांनी तर आभार शाळेचे पर्यवेक्षक सखाराम मातले यांनी मानले.

## समर्थ इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बांगरवाडी (बेल्हे)




# समर्थ फार्मसीत ७ वी चरक सुश्रुत व्याख्यानमाला संपन्न

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचालित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक औषध निर्माता दिनानिमित्त चरक शूश्रुत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानमालेचे हे ७ वे वर्ष आहे. या व्याख्यानमालेतील पहिले पुष्प डॉ.राजेंद्र पाटील यांनी जागतिक स्तरावर आरोग्य विषयक आव्हानांना तोंड देण्यासाठी फार्मासिस्टची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले.त्यानंतर डॉ.अभिजीत जोंधळे यांनी उद्योजकता विकास व औषध निर्माण शास्त्रातील उद्योजक व्यवसायाच्या संधी या विषयावर व्याख्यान दिले. या व्याख्यानमालेबरोबरच आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थी निर्मित पोस्टर स्पर्धा, त्याचबरोबर लोगो डिझाईन स्पर्धा, वैज्ञानिक रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. आरोग्य सेवा प्रणालीमध्ये फार्मासिस्टची महत्वाची भूमिका आहे आणि फार्मासिस्ट हा आरोग्य व औषध निर्माण शास्त्र यातील महत्त्वाचा घटक आहे. गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक स्तरावरती औषध निर्माण शास्त्रामध्ये भारताने मोठी प्रगती केलेली आहे आणि मोठ्या प्रमाणावर संशोधन कार्य सुरू असल्याचे मान्यवरांनी विशद केले.या स्पर्धांसाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.स्नेहलताई शेळके व समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सौ.वैशालीताई आहेर, समर्थ शैक्षणिक संकुलाचे कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत तसेच टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले हे उपस्थित होते.

या उपक्रमांबरोबरच आळेफाटा या ठिकाणी पथनाट्याचेही सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. त्यामध्ये प्रामुख्याने विविध औषध प्रकार, उपयोग,गैरवापर व तोटे यावर पथनाट्य व प्रभातफेरी यांचे आयोजन करण्यात आले होते. हे उपक्रम यशस्वी होण्यासाठी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.बसवराज हतपक्की, समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.संतोष घुले, डॉ.सचिन दातखिळे, डॉ.शितल गायकवाड, डॉ.बिपिन गांधी, डॉ.मंगेश होले, प्रा.सुजित तांबे, प्रा.गणेश लामखडे, प्रा.अक्षय फुलसुंदर आणि त्यांचे सर्व सहकारी शिक्षक कर्मचारी यांनी नियोजन केले. औषध निर्माण शास्त्र दिनानिमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके यांनी शुभेच्छा दिल्या आणि यशस्वी व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट,बांगरवाडी (बेल्हे)




## अभियंता दिनाच्या निमित्ताने समर्थ शैक्षणिक संकुलात विविध स्पर्धांचे आयोजन

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बेल्हे या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त अभियंता दिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांनी दिली.

विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांच्यामध्ये असलेल्या शैक्षणिक कलागुणांना एक व्यासपीठ निर्माण व्हावं यासाठी तांत्रिक प्रश्नमंजुषा,पोस्टर सादरीकरण,फोटोग्राफी व फिल्म मेकिंग स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांमध्ये अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. इंजिनीयर डे निमित्त विद्यार्थ्यांना संबोधित करताना विभाग प्रमुख प्रा.निर्मल कोठारी म्हणाले की, डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसानिमित्त हा इंजिनियर्स डे आपण साजरा करत असतो. इंजिनीअर्स म्हणून आपण आपली वेगळी ओळख निर्माण करावी ती ओळख आपल्या कामातून कार्यातून कर्तुत्वाद्वारे सिद्ध करता आली पाहिजे. कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की आपण मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या हितासाठी तसेच समाजामध्ये असलेल्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी करावा. इंजिनियरिंग शाखा ही मल्टी डिसिप्लिनरी असल्याकारणाने आपण ज्या शाखेमध्ये प्रवेश घेतलेला आहे तेवढ्यापुरतेच मर्यादित न राहता आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत.

यावेळी कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा.स्नेहा शेगर,आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभाग प्रमुख प्रा.शुभम शेळके, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.विशाल जोशी,मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.अमोल खतोडे,सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.अमोल भोर,प्रथम वर्ष विभाग प्रमुख प्रा.राजू वाकळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे:-

प्रश्नमंजुषा स्पर्धा-प्रथम क्रमांक-सिद्धार्थ वाघ,श्रेयस साखरकर, सानिका चाटे

द्वितीय क्रमांक-अपूर्वा पोखरकर,साक्षी भोर,दीक्षा औटी

ब्रॉडकास्ट युअर सेल्फ स्पर्धा- प्रथम क्रमांक-सुरज पवार

द्वितीय क्रमांक-साक्षी गोरडे,पूजा जाधव

फोटोग्राफी स्पर्धा-प्रथम क्रमांक-वैष्णवी जाधव ,दिव्या निलख,वैष्णवी घायाळ

द्वितीय क्रमांक-प्रतीक बांगर,ऋषिकेश गुंजाळ,आकाश लोणकर

पोस्टर स्पर्धा-प्रथम क्रमांक-मयूर देशमुख, अंकिता दिवेकर,अक्षय कासार

द्वितीय क्रमांक-पायल निकम,निकिता बागडे

# समर्थ टोयोटा टेक्निकल एज्युकेशन प्रोग्राम,बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थ टोयोटा केंद्र कौशल्य स्पर्धेत यशस्वी

समर्थ टोयोटा टेक्निकल एज्युकेशन प्रोग्राम अंतर्गत सुरू असलेल्या कौशल्य विकास केंद्रातील बॉडी टेक्निशियन विभागाचा विद्यार्थी अभिषेक औटी आणि पेंट टेक्निशियन विभागाचा विद्यार्थी तुषार गवांदे यांनी टोयोटा किर्लोस्कर मोटार लिमिटेड यांनी आयोजित केलेल्या पश्चिम विभागीय स्किल कॉन्टेस्ट (कौशल्य स्पर्धेत) यश संपादन केल्याची माहिती, प्राचार्य श्री.पांडुरंग हाडवळे यांनी दिली. टोयोटा किर्लोस्कर मोटार लिमिटेड आणि समर्थ औद्योगिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हे कौशल्य विकास केंद्र चालविले जाते. यामध्ये ऑटो बॉडी टेक्निशियन या अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांना १०० टक्के नोकरी प्राप्त होत असते. पेंट टेक्निशियन अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या तुषार गवांदे याने पश्चिम विभागीय स्पर्धेमध्ये की जी महाराष्ट्र, गोवा, गुजरात या राज्यासाठी आयोजित केली होती त्यामधील पेंट टेक्निशियन विभागात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. बॉडी टेक्निशियन अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या अभिषेक औटी याने बॉडी टेक्निशियन विभागात तृतीय क्रमांक प्राप्त केला. तळेगाव या ठिकाणी संपन्न झालेल्या या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून राजेश मिनान (वाईस प्रेसिडेंट टोयोटा किर्लोस्कर मोटर लिमिटेड), रवी प्रकाश सोनटक्के (डेप्युटी जनरल मॅनेजर), आर. एम. प्रशांत (मुंबई एरिया मॅनेजर) के. महेश , सचिन अत्रे (गुजरात एरिया मॅनेजर), श्री.संदीप पवार इत्यादी मान्यवर तसेच पश्चिम विभागातील तीन राज्यातील सर्व डीलर व डीलर मॅनेजमेंट टीम उपस्थित होती. तसेच समर्थ टोयोटा केंद्रातील माजी विद्यार्थी विजय अनिल गोडसे याची नुकतीच टोयोटा किर्लोस्कर प्रशिक्षण केंद्र पश्चिम विभाग या ठिकाणी प्रशिक्षक पदी निवड झाली. या विद्यार्थ्याचे ऑटोमोटिव्ह बॉडी अँड पेंट रिपेअर यातील कौशल्य पाहता एक वर्षाच्या आतच त्याची प्रशिक्षक पदी निवड झाली ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. समर्थ टोयोटा केंद्रातील या विद्यार्थ्यांना श्री.विष्णू मापारी, श्री.स्वप्निल कवडे आणि श्री.रोहित गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.वसंतराव शेळके, उपाध्यक्ष श्री.माऊलीशेठ शेळके, सचिव श्री. विवेक शेळके, विश्वस्त श्री.वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांनी अभिनंदन केले.

# समर्थ शैक्षणिक संकुल,बांगरवाडी (बेल्हे)



## समर्थ शैक्षणिक संकुलात युवा पर्यटन क्लबच्या वतीने जागतिक पर्यटन दिन संपन्न, शिवकालीन मर्दानी साहसी खेळ व लुप्त होत जाणाऱ्या कलाविष्कारांचे आयोजन

जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने समर्थ शैक्षणिक संकुलातील समर्थ गुरुकुल, समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स, समर्थ कॉलेज ऑफ इंजिनीअरींग अँड मॅनेजमेंट यामध्ये महाराष्ट्र शासन पर्यटन मंत्रालय यांच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या युवा पर्यटन क्लबच्या माध्यमातून जागतिक पर्यटन दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्यातील पर्यटन हे गडकिल्ल्यांभोवती केंद्रित झालेले आहे. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेले दुर्ग वैभव पाहण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक महाराष्ट्रामध्ये येत असतात. शिवकालीन साहसी खेळ व लुप्त होत जाणाऱ्या कलाविष्कार यांच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन युवा पर्यटन क्लब मधील सदस्यांसाठी करण्यात आले होते. यावेळी छत्रपतींचे सेवक मर्दानी आखाडा,जुन्नर यांच्या वतीने मार्गदर्शक आकाश फुलपगार तसेच रिया फुलपगार,तन्वी रोकडे,शौर्य काकडे,आरुष रोकडे यांनी साहसी खेळाची उत्तम प्रात्यक्षिके केली. यामध्ये तलवारबाजी, निशानेबाजी, दांडपट्टा चालवणे,भालाफेक करणे त्याचबरोबर लाठीकाठीचे साहसी प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आली.लाठीकाठी चालविण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. तसेच राष्ट्रीय नेमबाज रायफल शूटिंग विजेती इशिता काकडे हिने रायफल शूटिंगचे उत्कृष्ट प्रदर्शन दाखविले. शिवकालीन शस्त्रास्त्रांमध्ये तलवार, दांडपट्टा,भाला इत्यादी प्रमुख शस्त्रांचा समावेश होता. लाठीकाठी तलवारबाजी दांडपट्टा यांच्या चित्त थरारक व नयन मनोहर प्रात्यक्षिकांनी सर्वांना अत्यंत प्रभावित केले व त्यांच्या नजरेची पारणे फिटली. त्याचबरोबर पर्यटन व शांतता या विषयाशी संबंधित निबंध स्पर्धा,चित्रकला स्पर्धेचे ही पर्यटन क्लबच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले.यावर्षी जागतिक वारसा नोंदीसाठी पुणे जिल्ह्यातील शिवनेरी,राजगड व लोहगड या किल्ल्यांची निवड करण्यात आलेली असून त्या दृष्टीने जनजागृती व्हावी म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती युवा पर्यटन क्लबचे समन्वयक प्रा.भूषण दिघे यांनी दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, क्रीडा संचालक एच. पी. नरसुडे, समर्थ गुरुकुलचे प्राचार्य प्रा.सतीश कुऱ्हे, समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्सचे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार, समर्थ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश गुजर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण दिघे,प्रा.दिनेश जाधव,प्रा.अश्विनी खटिंग,प्रा.सखाराम मातेले यांनी उपस्थित राहून जागतिक पर्यटन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



# समर्थ ज्युनिअर कॉलेजची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत पाच पदकांची कमाई

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा कार्यालय,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राजतोरण कुस्ती संकुल,विंझर येथे पुणे जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा दि.२३ ते २५ सप्टेंबर २०२४ या कालावधीमध्ये संपन्न झाल्या. या स्पर्धांमध्ये १९ वर्षाखालील वयोगटात समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या दोन विद्यार्थ्यांनी रौप्य पदक तसेच दोन विद्यार्थ्यांनी व एका विद्यार्थिनीने प्रत्येकी एक ब्राँझ पदक अशी पाच पदकांची कमाई केल्याची माहिती समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सौ.वैशालीताई आहेर यांनी दिली.

निकालपत्र :

* ९७ किलो वजनी गट मुले–
  वेदांत नानाभाऊ नवले–रौप्य पदक
* ८७ किलो वजनी गट मुले–
  रोशन रोहिदास लामखडे–रौप्य पदक
* ६७ किलो वजनी गट मुले–
  करण शंकर पानसरे–ब्राँझ पदक
* ६३ किलो वजनी गट मुले–
  स्वप्निल भास्कर चासकर–ब्राँझ पदक
* ६२ किलो वजनी गट–मुली–
  कु.अलिशा शरिफ शेख–ब्राँझ पदक

या यशस्वी विद्यार्थ्यांना समर्थ शैक्षणिक संकुलाचे क्रीडा संचालक श्री.एच. पी. नरसुडे, क्रीडा शिक्षक डॉ.राजाभाऊ ढोबळे, श्री.सुरेश काकडे, प्रा.किर्ती थोरात, श्री.ज्ञानेश्वर जाधव, प्रा.संतोष पोटे, प्रा.राजेंद्र नवले, प्रा.विनोद चौधरी, प्रा.अमोल खामकर यांनी मार्गदर्शन केले. समर्थ शैक्षणिक संकुलामध्ये समर्थ क्रीडा प्रबोधिनी अंतर्गत समर्थ कुस्ती केंद्राची स्थापना यावर्षी करण्यात आली असून शालेय खेळाडूंसाठी आधुनिक मॅट व दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. या केंद्रात प्रशिक्षित झालेल्या खेळाडूंनी पहिल्याच वर्षात उत्तम कामगिरी केल्याचे समाधान आहे, असे संस्थेचे सचिव श्री.विवेक शेळके यांनी सांगितली. सर्व यशस्वी व सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री.वसंतराव शेळके, उपाध्यक्ष श्री.माऊलीशेठ शेळके, सचिव श्री.विवेक शेळके, विश्वस्त श्री.वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांनी अभिनंदन केले.

# समर्थ ज्युनिअर कॉलेज,बांगरवाडी (बेल्हे)



## समर्थमधील तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत १८७ संघांचा सहभाग

पुणे जिल्हा क्रीडा परिषद,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे,जुन्नर तालुका क्रीडा शिक्षक संघटना व समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ जुनिअर कॉलेज बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने १४,१७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुली यांची तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा समर्थ क्रीडा संकुलात संपन्न झाल्याची माहिती जुनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशालीताई आहेर यांनी दिली.

या स्पर्धेचे उद्घाटन सुप्रसिद्ध वक्ते व कीर्तनकार निलेश महाराज कोरडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,जिल्हा परिषद माजी सदस्या स्नेहलताई शेळके,जुनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष तबाजी वागदरे,क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष गणेश राऊत,सचिव संजय खराडे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत एकूण १८७ मुले-मुलीच्या संघाने सहभाग घेतला होता. विजेते संघ खालील प्रमाणे:

१४ वर्षे मुली :

प्रथम क्रमांक : रेवूबाई बाळाजी देवकर विद्यालय वडगाव आनंद

द्वितीय क्रमांक : पंडित नेहरू विद्यालय निमगाव सावा

तृतीय क्रमांक : शंकरराव बुट्टे पाटील विद्यालय जुन्नर

१७ वर्ष मुली:

प्रथम क्रमांक : ग्रामोन्नती मंडळाचे माध्यमिक विद्यालय गुंजाळवाडी

द्वितीय क्रमांक: संत गाडगे महाराज विद्यालय पिंपळगाव जोगा

तृतीय क्रमांक : चैतन्य विद्यालय ओतूर

१९ वर्ष मुली:

प्रथम क्रमांक : अण्णासाहेब वाघिरे कॉलेज ओतूर

द्वितीय क्रमांक : श्री शिवछत्रपती ज्युनिअर कॉलेज जुन्नर

तृतीय क्रमांक : रा प सबनीस ज्युनिअर कॉलेज नारायणगाव

१४ वर्ष मुले:

प्रथम क्रमांक : चैतन्य विद्यालय ओतूर

द्वितीय क्रमांक : मॉडर्न स्कूल बेल्हे

तृतीय क्रमांक : महात्मा गांधी हायस्कूल पारगाव

१७ वर्ष मुले:

प्रथम क्रमांक : कुलस्वामी खंडेराय विद्यालय हिवरे(बु )

द्वितीय क्रमांक : रा प सबनीस विद्यामंदिर नारायणगाव

तृतीय क्रमांक : ज्ञानमंदिर हायस्कूल आळे

१९ वर्ष मुले:

प्रथम क्रमांक : रा प सबनीस ज्युनिअर कॉलेज नारायणगाव

द्वितीय क्रमांक : ज्ञानमंदिर जुनिअर कॉलेज आळे

तृतीय क्रमांक : श्री शिवछत्रपती कॉलेज जुन्नर

# समर्थ शैक्षणिक संकुल,बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थ शैक्षणिक संकुलामध्ये आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्राचे उद्घाटन

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल येथे नुकतेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता दिघा विभागामार्फत या विकास केंद्राचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते दूरदृश्य प्रणाली द्वारे करण्यात आले. किसान गॅस क्लीन एनर्जी टेक सोल्युशन प्रा. लि. चे मॅनेजर प्रमोद खोसे, कॉर्पोरेट ट्रेनर अभिजित सावेकर,गेट ट्युटरचे अधिकारी मल्लिकार्जुन बोरीगिड्डे आदी मान्यवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते.

कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक युवतींना व्हावा या दृष्किोनातून राज्यातील नामांकित महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात येत आहेत महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनवण्याच्या दृष्किोनातून आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे या कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालयातील व महाविद्यालयाबाहेरील विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये कौशल्य अधिष्ठित प्रशिक्षण घेण्याची संधी प्राप्त होणार असल्याची माहिती संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी दिली. यावेळी मोफत कौशल्य शिक्षण व नोकरी या दोन्ही गोष्टीचा समन्वय साधत विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित करण्याचा मानस संस्थेचे सचिव विवेक शेळके यांनी व्यक्त केला.

विद्यार्थ्यांना सोलर पंप टेक्निशियन व सोलर पी व्ही इन्स्टॉलर (सूर्य मित्र) या दोन क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित करण्याच्या दृष्टीने येथे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. कुशल रोजगारक्षम महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पदविका पुरेशी नसून त्यांच्याकडे कौशल्य असणे आवश्यक आहे. या कौशल्याच्या जोरावर ते उत्तम करिअर घडवू शकतात अशी माहिती समर्थ पॉलीटेक्निकचे प्राचार्य प्रा.अनिल कपिले यांनी दिली.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.संजय कंधारे, प्रा.महेंद्र खटाटे, प्रा संकेत विघे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. सतीश गुजर, समर्थ पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.अनिल कपिले, टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर तसेच सर्व विभागाचे प्राचार्य, विभागप्रमुख,शिक्षक व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट या महाविद्यालयाचे ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा.सचिन पोखरकर यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर आभार प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांनी मानले.

# समर्थ ज्युनिअर कॉलेज,बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थच्या विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत यश १३ खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

पुणे जिल्हा क्रीडा परिषद,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे,जुन्नर तालुका क्रीडा शिक्षक संघटना व व्हिजन इंटरनॅशनल स्कूल डुंबरवाडी ओतूर यांच्या संयुक्त विद्यमाने १४,१७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुली यांची तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. या स्पर्धेमधून समर्थ च्या एकूण १३ खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड झाल्याची माहिती ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशालीताई आहेर व गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे यांनी दिली.

यशस्वी खेळाडूंची नावे पुढीलप्रमाणे:

१४ वर्षे मुले: हार्डल्स- प्रथम क्रमांक-साई दिघे

उंच उडी- तृतीय क्रमांक -श्रेयस म्हस्के

४०० मीटर धावणे- तृतीय क्रमांक-कार्तिक पुंडे

१७ वर्षे मुले: १०० मीटर धावणे-

प्रथम क्रमांक-गौरव मटाले

हर्डल्स-प्रथम क्रमांक-आर्यन भांबेरे

१७ वर्षे मुली: ४ X १०० रीले-

प्रथम क्रमांक-साक्षी आहेर,संस्कृती देशमाने,सानिका मेहेर,चैत्राली गुंजाळ.

हर्डल्स-प्रथम क्रमांक-साक्षी आहेर

तृतीय क्रमांक-समृद्धी शेळके

१९ वर्षे मुले: तिहेरी उडी-प्रथम क्रमांक-रोहन सुडके

थाळीफेक-प्रथम क्रमांक-स्वप्निल चासकर

२०० मीटर धावणे-द्वितीय क्रमांक-फैयाज शेख

तृतीय क्रमांक-वरद डुकरे

उंच उडी-द्वितीय क्रमांक-प्रवीण गगे

तिहेरी उडी-द्वितीय क्रमांक-सिद्धेश बांगर

गोळा फेक-तृतीय क्रमांक-स्वप्निल चासकर

४ X १०० रिले-द्वितीय क्रमांक-वैष्णवी गायके, मयुरी झावरे,प्रीती अडसरे,ईश्वरी दाते.

या खेळाडूंना क्रीडा संचालक एच पी नरसुडे, क्रीडा शिक्षक डॉ.राजाभाऊ ढोबळे, सुरेश काकडे, कीर्ती थोरात, ज्ञानेश्वर जाधव यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषद माजी सदस्या स्नेहलताई शेळके, जुनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर, समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स,बांगरवाडी (बेल्हे)



## प्रत्येकाच्या जीवनाची भिंत बांधताना कस्तुरी ओतणाऱ्या आई-वडील व शिक्षकांना विसरू नका- प्रा.रतिलाल बाबेल

समर्थ रुरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स बेल्हे या महाविद्यालयातील प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थी स्वागत समारंभ मार्गदर्शन कार्यक्रम आणि सेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या प्राध्यापकांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्यावेळी प्रेरणादायी वक्ते प्रा.रतिलाल बाबेल बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.उत्तम शेलार होते. यावेळी कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, डॉ.लक्ष्मण घोलप, प्रा.लोकेश डुंबरे,बीसीएस विभागप्रमुख प्रा.निलेश गावडे, बीबीए बीकॉम विभाग प्रमुख प्रा.गणेश बोरचटे, बीएससी आयटी विभागप्रमुख प्रा.प्रशांत काशीद, एमसीए एमसीएस विभागप्रमुख प्रा.योगेश राऊत, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.दिनेश जाधव तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.रतिलाल बाबेल म्हणाले की, AI मुळे नोकऱ्या जाणार नाही तर नोकऱ्यांचे विस्थापन होईल. स्वतःला अपग्रेड करीत, AI तंत्रज्ञानाची कास धरावी लागेल. हे करीत असताना माणूस एकलकोंडा होण्याची शक्यता नाकरता येत नाही. भविष्यात अधिक मानसोपचार तज्ञांची गरज पडेल. प्रत्येकाला काहीतरी छंदाची जोड देऊन योग अभ्यास शिकावाच लागेल. AI चे फायदे अनेक असताना सुद्धा,नैतिक चिंतेबरोबर गोपनीयता समस्या सुद्धा वाढणार आहे.अख हे साधन आहे.अख शक्तिशाली सहयोगी आहे,प्रतिस्पर्धी नाही. मानवी सर्जनशीलतेपुढे सगळे काही फिके आहे.

न्यूनगंडाला आत्मविश्वासात रूपांतरित करता येते हे सुरज चव्हाण या कलाकाराकडून शिकता येते. विद्यार्थ्यांनी कुतुहल जागृत ठेवा. का? कसे? केव्हा? कुठे? किती? यासारखे प्रश्न मनाला विचारा. प्रश्न विचारणाऱ्या अर्जुनाला आपला मित्र बनवा. लोग क्या कहेंगे (LKK) या रोगाचा जास्त विचार करू नका. गरजा व हाव यातील फरक ओळखा. सैनिकांच्या प्रति कृतज्ञ रहा. त्यांच्या त्यागाचा,शौर्याचा,निष्ठेचा सन्मान राखा. यशस्वी होण्यासाठी मोठे स्वप्न पहा. स्वप्नांची यादी करा. सकाळी उठल्याबरोबर त्याची उजळणी करा. गरिबी, लाचारी,नकारात्मकता यशाच्या आड येत नाही. जिद्द,चिकाटी,मेहनत यश प्राप्त करून देते. विपरीत परिस्थितीत सुद्धा यश मिळवता येते हा आत्मविश्वास मनात जागू द्या. व्यसन करायला नाही तर निर्व्यसनी राहायला हिम्मत लागते. अपयश,निंदा पचवायला शिका. आई वडिलांचा फोन कट करीत जाऊ नका. अनेकांना तो फोन कधीच येत नाही. दुर्लक्ष करायला शिका,लगेच प्रतिक्रिया देऊ नका. तंत्रज्ञानाच्या युगात आनंदाने जगायचे असेल तर एखादा तरी आवडीचा छंद जोपासा.नैतिकतेची पातळी तपासा.संवाद हरवू देऊ नका. पाणी,माती आणि नाती जपा. कपडे व शरीराची स्वच्छता करतो तसे मनाची स्वच्छता करा. सतत प्रयत्नशील रहा,मध्येच थांबू नका. अपयशातून बोध घ्या. आपले शरीर आपला जीवनसाथी आहे. शरीराला फिट ठेवा. त्यासाठी प्राणायाम,मेडिटेशन करा. दररोज ३५ मिनिटे वेगाने चाला असा सल्ला प्रा.बाबेल यांनी विद्यार्थ्यांना दिला.

# समर्थ ज्युनिअर कॉलेज,बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थ ज्युनिअर कॉलेजचे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत यश

जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे,जुन्नर तालुका क्रीडा शिक्षक संघटना व विशाल जुन्नर सेवा मंडळ संचलित व्ही.जे. इंटरनॅशनल स्कूल नगदवाडी वडगाव कांदळी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जुन्नर तालुकास्तरीय खो–खो स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या.

या स्पर्धांमध्ये समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा १९ वर्षाखालील वयोगटातील मुले व मुली दोन्ही संघ उपविजयी झाले. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्तम खेळाचे प्रदर्शन केले व यश संपादन केले, अशी माहिती समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सौ.वैशाली आहेर मॅडम यांनी दिली. यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा संचालक श्री.एच.पी. नरसुडे, क्रीडा शिक्षक राजाभाऊ ढोबळे, प्रा.सुरेश काकडे, प्रा.किर्ती थोरात, प्रा.ज्ञानेश्वर जाधव, प्रा.संतोष पोटे यांनी मार्गदर्शन केले.

सर्व यशस्वी खेळाडूंचे व क्रीडा शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष श्री.वसंतराव शेळके, उपाध्यक्ष श्री.माऊलीशेठ शेळके, सचिव श्री.विवेक शेळके,विश्वस्त श्री.वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.स्नेहलताई शेळके यांनी अभिनंदन केले.

## समर्थ ज्युनिअर कॉलेजची प्रांजल हुलवळे बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे व शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा सन २०२४–२५ नुकत्याच जुन्नर येथे पार पडल्या. समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेज बेल्हे या विद्यालयातील इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी कु प्रांजल शांताराम हुलवळे हिने तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये १९ वर्ष वयोगटामध्ये प्रथम क्रमांक पटकावल्याची माहिती प्राचार्या वैशालीताई आहेर यांनी दिली.

# समर्थ गुरुकुल,बांगरवाडी (बेल्हे)






## समर्थच्या विद्यार्थ्यांनी बनविल्या पर्यावरणपूरक गणेशमुर्ती

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल या सी.बी.एस.ई. मान्यताप्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक जवळपास ३१० मुर्तींची निर्मिती केली व त्याचे प्रदर्शन नुकतेच शाळेमध्ये भरविण्यात आले होते. या पर्यावरणपूरक मूर्ती बनविण्यासाठी विद्यार्थ्यांनी शाडूची माती त्याचबरोबर लाकडाचा भुसा,कागदाचा लगदा तसेच झाडांच्या पानांचा सुद्धा उपयोग केला.तसेच या मूर्ती रंगविण्यासाठी नैसर्गिक रंगांचा वापर करण्यात आला होता. मूर्तींच्या सजावटीसाठी विद्यार्थ्यांनी जे साहित्य वापरले ते सुद्धा नैसर्गिक फुले,पाने,कागद,धागे,कापड,लाकूड,बांबू अशा प्रकारचे होते. या पर्यावरणपूरक मूर्ती निर्माण करून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. गणेश मूर्ती बनवण्यासाठी समर्थ गुरुकुलच्या कलाशिक्षका दिप्ती चव्हाण व पुजा भुजबळ यांनी परिश्रम घेतले. समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतिश कुऱ्हे, पर्यवेक्षक एच.पी. नरसुडे, सखाराम मातेले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, संचालिका सारिकाताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांनी सदर प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचे कौतुक केले.

# समर्थ पॉलिटेक्निक, बांगरवाडी (बेल्हे)



## समर्थ पॉलिटेक्निक मध्ये 'इंडस्ट्रियल रोबोटिक्स' विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ पॉलिटेक्निक,बेल्हे या तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने 'इंडस्ट्रियल रोबोटिक्स' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. या कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, समर्थ पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.अनिल कपिले, टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले, प्रा.संजय कंधारे, सर्व विभागप्रमुख,शिक्षक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या दोन दिवसीय कार्यशाळेसाठी सॅप पाट्र्स प्रायव्हेट लिमिटेड येथील रोबोटिक्स इंजिनियर निलेश केकने हे तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. सदरच्या कार्यशाळेत रोबोटिक्स या तंत्रज्ञानासाठी वापरण्यात येणारे प्रोग्राम्स,त्याचे मूलभूत ज्ञान मुलांना देण्यात आले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना वस्तू उचलून दुसरीकडे ठेवणारा रोबोट,सोलर ऊर्जा ट्रॅक करणारा रोबोट,व्हॅक्युम क्लिनिंग करणारा रोबोट, स्मार्ट कार रोबोट, रोपवे रोबोट, वायफायच्या माध्यमातून बोलणारा रोबोट आणि आग शोधून भिजवणारा रोबोट अशा विविध प्रकारच्या रोबोट साठीचे प्रोग्राम आणि छोटे रोबोट विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या जोडले व ऑपरेट केले.

सदर कार्यशाळेत द्वितीय आणि तृतीय वर्ष निकटोनिक्स तसेच तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सदर कार्यशाळेदरम्यान रोबोटिक्स इंजिनियर निलेश केकन यांनी विद्यार्थ्यांना औद्योगिक सहली च्या निमित्ताने शिक्रापूर येथील कंपनीला भेट देण्यास सांगितले. द्वितीय आणि तृतीय वर्षाचे मेकॅट्रॉनिक्स इंजिनियरिंग चे विद्यार्थी तसेच तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विद्यार्थी बहुसंख्येने या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. सदर कार्यशाळेसाठी मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा.शाम फुलपगारे, प्रा.संदीप त्रिभुवन, प्रा.प्रकाश डावखर यांनी विशेष परिश्रम घेतले.



# समर्थ अभियांत्रिकीच्या ९ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटद्वारे सिरमा एस.जी.एस. टेक्नॉलॉजी लिमिटेड कंपनीत निवड

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बेल्हे या अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग विभागातील ९ विद्यार्थ्यांची सिरमा एस.जी.एस. टेक्नॉलॉजी लिमिटेड या कंपनीत निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.सतीश गुजर यांनी दिली. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाच्या वतीने कॅम्पस ड्राईव्ह २०२४ अंतर्गत या कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. सिरमा एस.जी.एस. टेक्नॉलॉजी लिमिटेड कंपनी ही ग्राहकांना जागतिक स्तरावर विविध प्रकारच्या पी.सी.बी. डिझाईन,फायबर ऑप्टिक असेंब्ली,मेमरी मॉडेल, आर.एफ.आय.डी. मॉडेल, पावर सप्लाय आणि अडॅप्टर, डीसी मोटर्स आदी प्रकारचे प्रॉडक्ट तयार करतात. महाविद्यालयातील प्लेसमेंट विभागातर्फे दरवर्षी नामांकित कंपन्यांना बोलवून थेट मुलाखतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच सद्यस्थितीतील उपलब्ध नोकरीच्या संधी बाबत मार्गदर्शन केले जाते. नुकत्याच पार पडलेल्या या कॅम्पस प्लेसमेंट मध्ये अंतिम वर्षाचे विद्यार्थी प्लेसमेंट साठी प्रविष्ट झाले होते. तीन स्तरावरती झालेल्या निवड प्रक्रियेत सुरुवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच.आर. राऊंड झाला.

कंपनीच्या वतीने सीनियर मॅनेजर आणि एच.आर. प्रमुख दिनेश मिश्रा व अजय पटोले आणि एच आर ट्रेनिंग विशेषज्ञ तुषार थोपटे यांनी निवड प्रक्रिया पूर्ण केली. त्यात अंतिम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग शाखेतील आदेश मुसळे, रुचिता जगताप, दिया जठार, अपूर्वा पोखरकर, निकिता काळे, सुषमा बगाटे, वैष्णवी म्हस्के, गायत्री तांबोळी व सानिका ढोबळे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या कॅम्पस ड्राईव्ह साठी इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलीकमुनिकेशन इंजिनियरिंग विभागप्रमुख प्रा.निर्मल कोठारी, ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागप्रमुख प्रा.सचिन पोखरकर, प्रा.प्रियांका लोखंडे, प्रा.पूनम भोर यांनी विशेष परिश्रम घेतले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर, सर्व विभागाचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# समर्थ टोयोटा टेक्निकल एज्युकेशन प्रोग्राम,बांगरवाडी (बेल्हे)




## टोयोटा करीयर डे च्या निमित्ताने समर्थ संकुलातील २७ विद्यार्थ्यांची निवड

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था बेल्हे व टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रा.लि.यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आलेला आहे.टोयोटा किर्लोस्कर मोटार या कंपनीच्या माध्यमातून समर्थ शैक्षणिक संकुलात ऑटोमोबाईल बॉडी रिपेअर व ऑटोमोबाईल पेंट रिपेअर हे एक-एक वर्षाचे दोन अभ्यासक्रम प्रशिक्षण व तांत्रिक शिक्षण विभाग,एन सी व्ही टी दिल्ली सरकारच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेले आहेत.या अभ्यासक्रमांना ४० विद्यार्थी प्रवेशित झालेले होते. कंपनीच्या वतीने अद्ययावत प्रशिक्षण उपकरणे,प्रशिक्षण सामग्री,साधने,तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन इत्यादी सर्व प्रकारच्या सुविधा या विद्यार्थ्यांना प्रदान केलेल्या आहेत.सदर अभ्यासक्रम एक वर्ष कालावधीचे आहेत. हा अभ्यासक्रम शिकत असताना टोयोटा कंपनीच्या वतीने तज्ञ मार्गदर्शक येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतात. त्याचबरोबर टोयोटा कंपनीच्या अधिकृत डीलरशिप मध्ये जवळपास एक महिनाभर विद्यार्थ्यांना इंटर्नशिप प्रोग्रॅम तसेच प्रशिक्षण दिले जाते.त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या कौशल्यामध्ये वाढ होत असते. सर्वसामान्य विद्यार्थी ज्यांना कमी कालावधीमध्ये कौशल्य प्राप्त करून रोजगार मिळवायचा असतो अशा विद्यार्थ्यांसाठी हे अभ्यासक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत. या अभ्यासक्रमांना प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना टोयोटा माफर्फत १०० टक्के रोजगाराची संधी मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि कुशल व सक्षम होण्यासाठी प्रशिक्षित करणे हे आमच्या संस्थेचे ब्रीद आहे असे संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी सांगितले. सदरच्या कॅम्पस ड्राइव्ह मध्ये २७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

शॉ टोयोटा पुणे सोहेल सय्यद,ज्ञानेश्वर दुडे,तन्मय किन्हे, किरण साठे या विद्यार्थ्यांची बॉडी रिपेयर तसेच विक्रांत दांगटर शुभम करंजेकर, अविष्कार तट्टु या विद्यार्थ्यांची पेंट रिपेअर कॅटेगरी मध्ये,तर शरयू टोयोटा पुणे येथे ओमकार शेळके,गणेश पिंगट,आदित्य दिघे,संदेश शिनारे,आवेश बेपारी,ह्या विद्यार्थ्यांची बॉडी रिपेयर कॅटेगरी मध्ये तर रियान शेख,ओंकार विश्वासराव,सूरज शिंदे,अल्पेश तांबोळी,यांची पेंट रिपेअर कॅटेगरी मध्ये तर सोनक टोयोटा बावधन, पुणे मध्ये मयुर दैने,जिवन ढेपले,अक्षय शिंदे ,रोहन राहणे ,कृष्णा मंडलिक यांची बॉडी रिपेयर या कॅटेगरी मध्ये तर राजयोग टोयोटा कात्रज,पुणे मध्ये तेजस खाडे,अक्षय मदगुले, आदेश चव्हाण,यांची पेंट रिपेअर कॅटेगरी मध्ये निवड करण्यात आल्याची माहिती प्राचार्य पांडुरंग हाडवळे यांनी दिली. या विद्यार्थ्यांना उप प्राचार्य विष्णू मापारी,स्वप्नील कवडे,अमोल करंजेकर यांनी प्रशिक्षण दिले.

या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांनी सर्व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

# समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स,बांगरवाडी (बेल्हे)



## बीबीए व बी.कॉम च्या १४ विद्यार्थ्यांची एच.डी.एफ.सी. बँकेत नोकरीसाठी निवड

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्युट संचलित समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अंतर्गत सुरू असलेल्या बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (बीबीए-आय बी) व बी.कॉम या पदवी अभ्यासक्रमातील शेवटच्या वर्षातील १४ विद्यार्थ्यांची एचडीएफसी बँकेमार्फत नोकरीसाठी निवड करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ.उत्तम शेलार यांनी दिली. बँकेत नवीन खाती ओपन करणे,चेक तयार करणे,एटीएम वितरित करणे, कर्ज प्रकरणे व त्या संदर्भातील आवश्यक माहिती यावर आधारित प्रश्न मुलाखती दरम्यान विचारण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये असलेला आत्मविश्वास, संभाषण कौशल्य, सॉफ्ट स्किल त्याचप्रमाणे काम करण्याची पद्धत या बाबींचा विचार करून सदर विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा.गणेश बोरचटे यांनी दिली.

समर्थ शैक्षणिक संकुलात बीबीए व बी कॉम या अभ्यासक्रमाची ही पहिलीच बॅच असल्याकारणाने ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागाच्या वतीने एचडीएफसी बँक, कोटक, महिंद्रा बँक त्याचप्रमाणे अनेक कंपन्यांशी प्लेसमेंट च्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आलेले होते. त्यामध्ये एचडीएफसी बँकेमध्ये या विद्यार्थ्यांची निवड झाल्याने पालकवर्गामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवड झालेले विद्यार्थी पुढील प्रमाणे:
किशोर आहेर, सोनाली आहेर, शर्मिला चौधरी, पूर्वा देशमुख, वैष्णवी घाडगे, वैष्णवी गायकर, वैष्णवी लाड, राजश्री पवार, पूजा रसाळ, अमृता रोकडे, शुभम शेळके, वेदिका येवले, सृष्टी गांजे, चेतना शिंदे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, डॉ.लक्ष्मण घोलप तसेच सर्व विभागातील प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# समर्थ गुरुकुल व ज्युनिअर कॉलेज,बांगरवाडी (बेल्हे)



## समर्थ गुरुकुल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश
## ९ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी पुणे अंतर्गत जुन्नर तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा नुकतीच ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर येथे पार पडल्या. त्यामध्ये समर्थ गुरुकुल व ज्युनिअर कॉलेजच्या खेळाडूंनी दैदीप्यमान कामगिरी केल्याची माहिती प्राचार्या वैशालीताई आहेर व प्राचार्य सतीश कुऱ्हे यांनी दिली. कुस्ती या क्रीडा प्रकारामध्ये मुलांबरोबरच मुलींचे प्रमाण लक्षनीय असून या तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये मुलींनी विविध वयोगटामध्ये विशेष प्राविण्य मिळवल्याची माहिती क्रीडा संचालक एच. पी. नरसुडे यांनी दिली.

स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे:-

१४ वर्षे मुली : ४१ किलो वजनी गट : द्वितीय क्रमांक : सई कोकाटे, ५४ किलो वजनी गट : द्वितीय क्रमांक : स्वरा शेंडकर, १७ वर्षे मुली : ५३ किलो वजनी गट : द्वितीय क्रमांक : श्रद्धा दिघे, ६५ किलो वजनी गट : प्रथम क्रमांक : दीक्षा गाडगे, १७ वर्ष मुले: ५५ किलो वजनी गट : द्वितीय क्रमांक : वेदांत चिकणे, ५७ किलो वजनी गट : द्वितीय क्रमांक : आर्यन दाते, १९ वर्ष वयोगट मुले: ६१ किलो वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक : वरद डुकरे, द्वितीय क्रमांक : हितेश घाडगे, ६७ किलो वजनी गटामध्ये ग्रीको या क्रीडा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक : स्वप्नील चासकर, ७२ किलो वजनी गटामध्ये ग्रीको या क्रीडा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक : करण पानसरे, ८६ किलो वजनी गट ग्रीको या क्रीडा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक : रोशन लामखडे, खुला गटामध्ये ग्रीको या क्रीडा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक : वेदांत नवले, १९ वर्षे वयोगट मुली : ५० किलो वजनी गटामध्ये द्वितीय क्रमांक : मयुरी झावरे ५७ किलो वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक : वैष्णवी गायके, ६२ किलो वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक : अलिशा शेख, ७६ किलो वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक : पायल चव्हाण

वरील प्रथम क्रमांक मिळवलेल्या खेळाडूंची राजतोरण कुस्ती संकुल विंझर ता.वेल्हा येथे २३ ते २६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी तालुक्यातून अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक डॉ.राजाभाऊ ढोबळे,किर्ती थोरात,सुरेश काकडे,डॉ.ज्ञानेश्वर जाधव यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, क्रीडा संचालक एच.पी. नरसुडे, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांनी अभिनंदन केले.




# समर्थ शैक्षणिक संकुलात माजी सैनिकांचा सन्मान सोहळा

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट राजुरी संचलित समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे 'सन्मान माजी सैनिकांचा भारतमातेच्या वीर सुपुत्रांचा' या कार्यक्रमांतर्गत माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, समर्थ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अॅन्ड मॅनेजमेंट चे प्राचार्य डॉ.सतीश गुजर, बीसीएसचे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर, जुन्नर तालुका माजी सैनिक संघटना व शिवनेरी माजी सैनिक संघटनेचे बहुसंख्य पदाधिकारी, सदस्य माजी सैनिक दिलीप आरोटे, कॅप्टन महादेव हाडवळे, सुभेदार मेजर ऑनररी लेफ्टनंट उमेश अवचट, गोपीनाथ कसाळ, गोपीनाथ कुटे, एकनाथ वाजगे, निवृत्त हवालदार रमेश खरमाळे, भास्कर डोंगरे, हवालदार शिवाजी पाटे, हवालदार संभाजी वाळुंज, नाईक संतोष घोडके, हवालदार हरिश्चंद्र कोल्हे, अरुण वऱ्हाडी, किसन ढवळे, वीरमाता चंद्रकला जाधव, ज्ञानदेव थोरवे, दामोदर घोलप, साईनाथ झिंजाड, सलीम युसुफ, नायक शिवाजी चौधरी, हवालदार संतोष काळे, बाळासाहेब मुळे, विलास जाधव, हवालदार दत्तात्रय आरोटे, दत्तात्रय मुरादे, मच्छिंद्र घोलप,कोंडाजी गुंजाळ,होनाजी गुंजाळ,नवनाथ गाढवे तसेच आर्मी नेव्ही, एयर फोर्स मधील सेवानिवृत्त अधिकारी व माजी सैनिक उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या माध्यमातून हर घर तिरंगा मोहिमे अंतर्गत तिरंगा रॅलीचे देखील आयोजन करण्यात आले होते.त्यामध्ये संकुलातील विद्यार्थी-विद्यार्थिनी व माजी सैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. माजी सैनिकांबद्दल कृतज्ञतेच्या भावनेतून व आदराप्रति दरवर्षी समर्थ संकुलात या स्तुत्य कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. भारतीय सैनिकांच्या शौर्याची गाथा खरंतर प्रत्येक भारतीयाच्या हृदयात कोरली जायला हवी अशी आहे. अभूतपूर्व साहस, जाज्वल्य देशाभिमान, दुर्दम्य इच्छाशक्ती, नि:सीम धैर्य आणि कठोर निर्धार यांच्या बळावर एकीकडे अपुरा शस्त्रसाठा,प्रतिकूल निसर्ग आणि दुसरीकडे अत्यंत आव्हानात्मक परिस्थिती असताना त्यांवर मात करत,आपल्या जिवाची तमा न बाळगता शरीरातल्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत लढणारे भारतीय सैन्याचे वीर जवान देशाची खरी संपत्ती आहे.

आजच्या तरुणाईपुढे शूरवीर जवानांच्या अपार शौर्याची कहाणी मांडताना सर्वसामान्य माणसामध्ये व सैनिकांमध्ये एक सुंदर भावबंध निर्माण करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घेऊन आपल्या शिक्षणाचा उपयोग देशसेवेसाठी करावा.पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येक विद्यार्थ्याने,नागरिकाने एक तरी झाड लावून स्वतःची आणि पुढच्या पिढीची काळजी घ्यावी असे प्रतिपादन माजी सैनिक रमेश खरमाळे यांनी केले.

# समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट,बांगरवाडी (बेल्हे)




## समर्थ अभियांत्रिकीच्या ११ विद्यार्थ्यांची 'क्यू स्पायडर' या कंपनीमध्ये निवड

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट,बेल्हे या अभियांत्रिकी महाविद्यालयातील ११ विद्यार्थ्यांची क्यू स्पायडर या कंपनीमध्ये निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.सतीश गुजर यांनी दिली. कॅम्पस ड्राईव्ह २०२४ अंतर्गत क्यू स्पायडर या कंपनीच्या वतीने कॉम्प्यूटर, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्म टेलकम्युनिकेशन,मेकॅनिकल,सिव्हिल इंजीनिअरिंग विद्यार्थ्यांसाठी मुलाखतीचे आयोजन नुकतेच समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट,बेल्हे या महाविद्यालयात करण्यात आले होते. क्यू स्पायडर ही जगातील सर्वात लोकप्रिय सॉफ्टवेअर प्रशिक्षण देणारी संस्था आहे. इंडस्ट्री आणि इन्स्टिट्यूट यांमधील गॅप भरून काढण्यासाठी कालानुरूप बदलणाऱ्या तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे व प्रशिक्षण देणे हा या संस्थेचा हेतू आहे. या संस्थेच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना जाव्हा फुल स्टॅक,सॉफ्टवेअर टेस्टिंग,पायथॉन फुल स्टॅक आदी प्रकारच्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. विविध मल्टीनॅशनल कंपन्यासाठी लागणारे मनुष्यबळ पुरवण्याचे काम ही संस्था करते. कंपनीच्या वतीने चंदना व एस जयश्री यांनी मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण केली.त्यामध्ये सकाळच्या सत्रामध्ये सर्व विद्यार्थ्यांची लेखी परीक्षेद्वारे कल चाचणी घेण्यात आली.त्यानंतर सांघिक चर्चा व व्यक्तिमत्त्व विकासावर आधारित मुलाखत घेण्यात आली. संवाद कौशल्य, सांघिक भावना, विश्लेषणात्मक विचारांची ओळख, सॉफ्ट स्किल ज्ञान आणि विषयाबाबतचे ज्ञान या घटकांचा विचार करून विद्यार्थ्यांची निवड केल्याची माहिती बँगलोर येथील क्यू स्पायडर ट्रेनर मधुश्री रघुरामा यांनी दिली.

अंतिम टप्प्यातील मुलाखतीमध्ये क्यू स्पायडर पॅनेलने विद्यार्थ्यांचे तांत्रिक कौशल्ये,विशेषज्ञता, सॉफ्ट स्किल्स आणि प्रस्तावित पदांसाठी त्यांची एकूण पात्रता तपासली गेली. या मुलाखतींमध्ये सखोल चर्चा आणि व्यक्तिमत्व मूल्यांकनासाठी भरपूर संधी उपलब्ध करून देण्यात आली. त्याच दिवशी मुलाखतींचे निकाल जाहीर करण्यात आले आणि ११ उत्कृष्ट उमेदवारांना क्यू स्पायडर मधील विविध पदांसाठी ऑफर पत्रे देण्यात आली. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील निवड झालेले विद्यार्थी पुढील प्रमाणे: आकाश आगळे, मयूर चिकणे, प्रज्वल एलभर, घनश्याम गुंड, आदित्य गुंजाळ, वैभव होंडे, जयेश कुमार नायर, वैष्णवी शेळके, अश्विनी शिंदे,संतोष वाघमारे व सिद्धांत वाकचौरे.

सदर मुलाखतीचे यशस्वी नियोजन करण्यासाठी कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख प्रा.स्नेहा शेगर, ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा.सचिन पोखरकर, प्रा.सिद्धेश गडगे यांनी परिश्रम घेतले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर, सर्व संस्थांचे प्राचार्य, विभागप्रमुख व शिक्षक यांनी अभिनंदन केले .

# समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, बांगरवाडी (बेल्हे)





## औरंगपूर येथे समर्थ हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट राजुरी संचलित समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर,बांगरवाडी (बेल्हे) व अंबिकामाता सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ,औरंगपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन दि. ०८ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आले. त्यात श्री.भरत थिटे व श्री.झुंबरशेठ थिटे यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन करण्यात आहे. शिबीरामध्ये परिसरातील २०४ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. सदर शिबीरास समर्थ शैक्षणिक संकुलाचे विश्वत श्री.वल्लभ शेळके यांनी भेट दिली.

या शिबीरास डॉ.रमेश पाडेकर, डॉ.टिपले, डॉ.कोकाटे, डॉ.कणोज, डॉ.चव्हाण, डॉ.वलवणकर यांनी रुग्णांची तपासणी करुन रुग्णांना मोफत औषधोपचार देण्यात आले. हे शिबीर संपन्न होण्यासाठी आयुर्वेदिक कॉलेजचा स्टाफ व नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले. सदर शिबीरास संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, डॉ.निचीत, श्री.यशवंत फापाळे यांनी मोलाचे सहकार्य केले.



# समर्थ शैक्षणिक संकुलामध्ये शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे नुकतेच ३ दिवसीय शिक्षक-प्रशिक्षण (फॅकल्टी डेव्हलपमेंट) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून मान्यवरांच्या उपस्थितीत या तीन दिवसीय कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सकाळच्या सत्रात प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी यांनी 'व्यक्तिमत्व विकास व प्रभावी सवांदकौशल्य' या या विषयावर मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रामध्ये प्रा.राजीव सावंत यांनी शिक्षण क्षेत्रातील व्यावसायिक नितीमूल्ये या बाबतचे महत्व विशद केले. अभ्यासक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी, शैक्षणिक लवचिकता, अभ्यासक्रम आणि फीडबॅक पद्धती, शैक्षणिक प्रक्रिया, गुणवत्ता, मूल्यमापन प्रक्रिया आणि सुधारणा, नवकल्पना आणि संशोधन संस्कृती' वाढवण्यासाठी संस्थेने दिलेल्या सुविधा यासंदर्भात मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ.चंद्रशेखर घुले यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढ आणि तणाव व्यवस्थापन या दोन्हीचा कसा समतोल साधायचा याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रा.पंकज नागमोटी यांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांची मानसिकता याबाबत सविस्तर चर्चात्मक संवाद साधला. प्रा.देवराव कांबळे यांनी प्रभावी अध्यापनासाठी आधुनिक पद्धतीने अध्यापन कसे करावे तसेच माहिती तंत्रज्ञानाचे प्रभावी अध्यापनासाठीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. डॉ.संजय देवकर यांनी अध्यापन अध्ययन पद्धती डॉ.संजय देवकर यांनी अध्यापन अध्ययन पद्धती तंत्र आणि संशोधन याविषयी मार्गदर्शन केले. प्रा.संजय कंधारे व प्रा.शाम फुलपगारे यांनी टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले व समर्थ पॉलिटेक्निक चे प्राचार्य प्रा.अनिल कपिले यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे संयोजन केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, अभियांत्रिकेचे प्राचार्य डॉ.सतीश गुजर, बीसीएस चे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार, डॉ.लक्ष्मण घोलप, समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.बसवराज हातपक्की, समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.संतोष घुले, समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे, क्रीडा संचालक एच.पी. नरसुडे व संकुलातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संगणक विभागप्रमुख प्रा.स्वप्निल नवले यांनी या कार्यक्रमाचा अभिप्राय घेऊन उपस्थितांचे आभार व्यक्त केले.



## सकारात्मक दृष्टिकोन आणि निरोगी शरीर हीच खरी यशाची गुरुकिल्ली : अनिल गुंजाळ 'परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावर झाले विचारमंथन

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित,समर्थ ज्युनिअर कॉलेज बेल्हे येथे 'चला आनंदाने शिकूया, स्वतःला घडवूया' या विषयावर नुकतेच एकदिवसीय मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणेचे माजी सहाय्यक आयुक्त अनिल गुंजाळ तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमापूजन करून या एकदिवसीय मार्गदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, क्रीडा संचालक एच.पी. नरसुडे तसेच सर्व विभागाचे प्राचार्य, विभागप्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अनिल गुंजाळ म्हणाले की,जीवनात अनेक वेळा अपयश येते त्याला न घाबरता,दडपण न घेता आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी नियमित व सातत्यपूर्ण अभ्यास करात सकारात्मक दृष्टिकोन आणि निरोगी शरीर हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे यावेळी अनिल गुंजाळ यांनी सांगितले. 'परीक्षेला सामोरे जाताना' विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करायचा याबद्दल अनिल गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले व चर्चात्मक संवाद साधत विचारमंथन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शाल, पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संगीता रिठे यांनी प्रास्ताविक प्राचार्या वैशाली आहेर यांनी तर आभार प्रा.रोकडे सर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा.संतोष पोटे, प्रा.राजेंद्र नवले, प्रा.सुरेखा पटाडे, प्रा.विनोद चौधरी यांनी परिश्रम घेतले.



## नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर : डॉ.मंगेश वाघमारे
## समर्थ शैक्षणिक संकुलात कार्यशाळेचे आयोजन

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे नुकतेच नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.मंगेश वाघमारे यांनी नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण चालू शैक्षणिक वर्षापासून सर्व विद्यार्थ्यांना लागू होणार आहे. या नव्या धोरणात विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात आलेला आहे.यामध्ये मल्टिपल एन्ट्री व मल्टिपल एक्झिटची सुविधा देखील उपलब्ध आहे. तसेच आंतरविद्याशास्त्र अभ्यासक्रम शिकवण्याची संधीही या शैक्षणिक धोरणाने मिळणार आहे. शिक्षणाने विद्यार्थ्यांना विचार करायला शिकवले पाहिजे. विद्यार्थ्यांचा सर्व गुण विकास होईल,विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा विकास होईल अशा पद्धतीचे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे हे नवीन शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. आपल्या भारत देशाला ज्ञान महासत्ता बनवायचे असेल तर जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणातील सहभाग वाढवला पाहिजे. त्यामुळे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरेल असा विश्वास पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा.डॉ.मंगेश वाघमारे यांनी यावेळी बेल्हे येथील आयोजित कार्यशाळेत व्यक्त केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी संपर्क अभियानांतर्गत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत जाणीव व जागृती व्हावी या उद्देशाने या विशेष कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. यावेळी डॉक्टर मंगेश वाघमारे यांनी उपस्थित विद्यार्थी पालक व शिक्षकांशी चर्चात्मक संवाद साधला. बारावी मधील विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत शैक्षणिक व्यवस्थेत झालेल्या बदलासंदर्भात तसेच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांना नोकरी व व्यवसायाच्या नवीन संधी कशा उपलब्ध होतील याबाबत डॉ.मंगेश वाघमारे यांनी पीपीटीद्वारे मार्गदर्शन केले.


ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.अमोल भोर, प्रा.गणेश बोरचटे, प्रा.निलेश गावडे, प्रा.प्रशांत काशीद यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्सचे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार, डॉ.लक्ष्मण घोलप, एमबीए कॉलेजचे प्राचार्य डॉ.शिरीष गवळी, अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.सतीश गुजर, डॉ.महेश भास्कर, डॉ.रुस्तुम दराडे, प्रा.शशिकांत ताजणे, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# समर्थ शैक्षणिक संकुलातील ९ प्राध्यापक पीएचडी पदवीने सन्मानित

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे फार्मसी, अभियांत्रिकी, व्यवस्थापन शास्त्र विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या ९ प्राध्यापकांना यावर्षी पीएचडी पदवी प्राप्त झाल्याची माहिती संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी दिली. समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये विभागप्रमुख म्हणून कार्यरत असणारे प्रा.सचिन दातखिळे यांनी सनराईज विश्वविद्यालय, अलवर, राजस्थान या विद्यापीठामार्फत 'मानवी रक्तामधील फार्मास्यूटिकल औषधांच्या मोजण्यायोग्य इच्छाशक्तीच्या प्रक्रियेचा वाढीचा अभ्यास' या विषयावर प्रबंध सादर केला. डॉ.मृणाल शिरसाट यांनी त्यांना मार्गदर्शन केले. प्रा.राहुल लोखंडे यांना मोनाड विश्वविद्यालय,हापूर,उत्तर प्रदेश या विद्यापीठामध्ये ऍसिटोफेनॉनपासून १,५ बेंझोडायझेपाईन डेरिव्हेटिव्हजचे सोयीस्कर संष्लेषण करण्यासाठी प्रस्थापित अल्डीहाईड एक मिरगी विरोधी औषधसंशोधन यावर प्रबंध सादर केला. डॉ.अंजुम कुमार शर्मा यांनी मार्गदर्शन केले. प्रा.संतोष पवार यांनी सनराईज विश्वविद्यालय, अलवर,राजस्थान मार्फत संस्थांमधील औदयोगिक संबंधामध्ये मानवी संसाधन विकास सराव पध्दतीवरील कार्यप्रदर्शन मुल्यमापन परिणामांचा प्रायोगिक अभ्यास या विषयावर प्रबंध सादर करत डॉ.दयानंद सुरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी प्राप्त केली. प्रा.सचिन भालेकर यांनी सनराइज विश्वविद्यालय अलवर राजस्थान या विद्यापीठांतर्गत चेतासंस्था संबंधातील निदानासाठी संश्लेषण क्लिनिकल बायो क्लीनिकल दृष्टिकोनाचा विकास या विषयावर प्रबंध सादर केला. डॉ.व्यंकटेश अलंकी यांनी त्यांना मार्गदर्शन केले. प्रा.सागर तांबे यांना मोनाड विश्वविद्यालय हापुर उत्तर प्रदेश या विद्यापीठा अंतर्गत हर्बल अँटी एजिंग सुत्रीकरणेयांचा विकास या विषयावर प्रबंध सादर केला. डॉ.विवेक गुप्ता यांनी त्यांना मार्गदर्शन केले. प्रा. शितल गायकवाड यांनी भगवंत विश्वविद्यालय अजमेर राजस्थान अंतर्गत जैविक स्वारस्य असलेल्या काही नवीन हेट्रोसायकलचे संश्लेषण आणि मूल्यांकन या विषयावर प्रबंध सादर केला. डॉ.रविंद्र लावरे यांनी त्यांना मार्गदर्शक म्हणून काम केले. समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये प्रा.मंगेश होले यांनी जवाहरलाल नेहरू तंत्रज्ञान विद्यापीठ,हैदराबाद,तेलंगणा या विद्यापीठांतर्गत १,२,३, ४-टेट्राहाइड्रोपायरीमिडीन आणि थायोफेन-2yl -पायरीमिडीनचे ट्युमर, वेदनाशामक आणि दाहक-विरोधी एजंट म्हणून संश्लेषण आणि मूल्यांकन या विषयावर प्रबंध सादर केला. डॉ.शशिकांत आर.पट्टण यांनी त्यांना मार्गदर्शन केले. तसेच समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट या विभागातील प्रा.रुस्तुम दराडे यांनी आरके विद्यापीठ राजकोट गुजरात अंतर्गत सामाजिक उद्योजकतेवर परिणाम करणारा घटक ओळखणे व महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील निवडक ग्रामीण भागाचा अभ्यास या विषयावर प्रबंध सादर केला. डॉ.अल्पेश नसित यांनी गाईड म्हणून काम पाहिले. समर्थ कॉलेज ऑफ इंजीनिअरींग मधील प्रा.निवृत्ती चौधरी यांनी जे जे टी यु युनिव्हर्सिटी अंतर्गत डी डी ओ एस स्मर्फ अटॅक प्रिव्हेन्शन अँड डिटेक्शन युजिंग पिकॅप अनालायझर अप्रोच या विषयावर प्रबंध सादर केला. डॉ.समीर शेख यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

# समर्थ पॉलिटेक्निक, बांगरवाडी (बेल्हे)



## समर्थच्या १३ विद्यार्थ्यांची ब्रेंबो ब्रेक्स या नामांकित कंपनीमध्ये निवड

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे येथे नुकतेच ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाच्या वतीने 'कॅम्पस ड्राईव्ह २०२४' अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. सदर कॅम्पस ड्राईव्ह मध्ये समर्थ शैक्षणिक संकुलातील तेरा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आल्याची माहिती समर्थ पॉलिटेक्निकचे प्राचार्य अनिल कपिले यांनी दिली. ब्रेंबो ब्रेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड पुणे या कंपनीमार्फत समर्थ शैक्षणिक संकुलातील पॉलिटेक्निक,बीसीएस व बीकॉमच्या विद्यार्थ्यांसाठी मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. ब्रेम्बो ब्रेक्स प्रायव्हेट इंडिया लिमिटेड या कंपनीच्या प्लांट एच.आर. सुवर्णा शेलार व डेप्युटी मॅनेजर सुधीर हर्गुडे यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखतीची निवड प्रक्रिया पूर्ण केली. मुलाखतीद्वारे निवड करताना विद्यार्थ्याला असलेले विषयाबाबतचे सखोल ज्ञान, संभाषण कौशल्य, सॉफ्ट स्किल, कल चाचणी या बाबींचा विचार करून निवड केल्याची माहिती डेप्युटी मॅनेजर सुधीर हरगुडे यांनी दिली. या मुलाखती मध्ये मेकॅनिकल इंजिनीअरींग विभागातून सुयोग लामखडे, ओमकार जाधव, शुभम कदम, अक्षय चोरे, रुपेश दिघे, आदित्य आहेर तर बी.बी.ए. विभागातून तन्मय शिरोळे, अपेक्षा रोहकले, किर्ती गांगड या विद्यार्थ्यांची तसेच समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स (बीसीएस) मधून कीर्ती खांडकर, गौरी दाते, वैशाली वराळ यांची तर कॉमर्स मधून किशोर आहेर यांची निवड करण्यात आली. सदर मुलाखतीचे नियोजन आय.टी.आय. विभागाचे विष्णू मापारी, समर्थ पॉलिटेक्निकचे ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट प्रमुख प्रा.संकेत विघे, महेंद्र खटाटे, हुसेन मोमीन आदींनी केले. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर तसेच सर्व विभागाचे प्राचार्य, विभागप्रमुख यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




## समर्थ फार्मसीच्या ५ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हे येथील ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट विभागाच्या वतीने आयोजित 'प्लेसमेंट ड्राईव्ह २०२४' अंतर्गत फार्मसी विभागातील विद्यार्थ्यांची नाशिक येथील 'जिनोम बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड' व गुजरात येथील 'अल्केम लॅबोरेटरीज लिमिटेड' या कंपन्यांमध्ये निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.संतोष घुले यांनी दिली. जिनोम बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड ही देशातील नामांकित फार्मास्युटिकल कंपनी असुन जगात नुट्रास्युटिकल औषधे निर्यात करण्यात अग्रगण्य आहे. तसेच अल्केम हे भारतातील जेनेरिक आणि स्पेशॅलिटी फार्मास्युटिकल क्षेत्रातील सर्वात मोठे नाव आहे व या गुजरात मधील कंपनीचा समावेश पहिल्या पाच क्रमांकामध्ये येतो.

प्लेसमेंट ड्राईव्ह साठी एकूण २० विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. जिनोम प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने प्रोडक्शन विभागप्रमुख अरविंद आठवले, एच.आर. श्रध्दा आहेर व प्लांट हेड एम. दलाई यांनी विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया पूर्ण केली.

निवड झालेले विद्यार्थी पुढील प्रमाणे:

अनिकेत वाळुंज,प्रसाद साळवे आणि अनंत कुचिक यांची जिनोम बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड नाशिक या कंपनीमध्ये तर प्रथमेश मोटे, माऊली पिंगट या विद्यार्थ्यांची अल्केम लॅबोरेटरीज लिमिटेड गुजरात या कंपनीमध्ये निवड करण्यात आली. या प्लेसमेंट ड्राईव्ह साठी ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी डॉ.बिपिन गांधी यांनी विशेष प्रयत्न केले. प्रा.नितीन महाले, प्रा.सुजित तांबे, प्रा.मंगेश होले, प्रा.अजय भागवत आदींनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले, समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.बसवराज हातपक्की, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर तसेच सर्व विभागाचे प्राचार्य,विभाग प्रमुख यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# समर्थ शैक्षणिक संकुल,बांगरवाडी (बेल्हे)




## रतन टाटांच्या जाण्याने समाजसेवेतील उद्योग रत्न हरपले:वल्लभ शेळके
## समर्थ संकुलात स्वर्गीय रतन टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली

प्रत्येक व्यक्ती हा स्वतःच्या हितासाठी आणि कुटुंबाच्या उद्धारासाठी जगत असतो. परंतु रतन टाटा यांनी आपले आयुष्य समाजसेवेसाठी समर्पित केले होते. ते गेल्याने खऱ्या अर्थाने समाज सेवेतील रत्न हरपले असून त्यांच्या जाण्याने समाजामध्ये जी पोकळी निर्माण झालेली आहे ती कधीही भरून न येण्यासारखी असल्याचे मत समर्थ शैक्षणिक संकुलाचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी व्यक्त केले. स्वर्गीय रतन टाटा यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, टेक्निकल डायरेक्टर डॉ.चंद्रशेखर घुले,रिसर्च अँन्ड इनोव्हेशन सेलचे डायरेक्टर डॉ.प्रतीक मुणगेकर सर्व विभागांचे प्राचार्य, विभागप्रमुख, क्रीडा संचालक एच. पी. नरसुडे, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर आदी उपस्थित होते. प्रसिध्द उद्योगपती पद्मविभुषण रतन टाटा हे खऱ्या अर्थाने भारतीय उद्योग विश्वातील कोहिनुर हिरा होते. त्यांच्या निधनाने एक प्रखर राष्ट्रप्रेमी आणि सर्व सामान्यांविषयी आस्था आणि आपुलकी असणाऱ्या एका महान उद्योजकाला आपण सर्व मुकलो आहोत असे उद्गार संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी काढले.

रतन टाटा हे एका प्रथितयश कुटुंबामधे जन्माला आल्यानंतर परदेशामध्ये आर्किटेक्टची पदवी प्राप्त केल्यानंतर सुद्धा टाटा स्टील ह्या कंपनीत फ्लोअर शॉप पासून त्यांनी कामाला सुरवात केली. सायकल वरती प्रवास करून कामगारांच्या बरोबर राहून कामगारांच्या अडचणी इथपासून सूरवात केल्या नंतर आज शंभर पेक्षा आधिक कंपन्यांचा विस्तृत असा टाटा समूहाचा वटवृक्ष त्यांनी उभारलेला आहे ही अलौकिक अशी बाब आहे. परंतु आजच्या तरुण पिढीसाठी हे अत्यंत प्रेरणादायी बाब आहे की,इतक्या मोठ्या कुटुंबातील व्यक्ती सुद्धा खालच्या स्तरापासून कामगारांमध्ये मिसळण्यापासून तर छोट्या मोठ्या गोष्टींमध्ये लक्ष घालून आपल्या उद्योग व्यवसायाचा विस्तार कसा करता येईलही गोष्ट त्यांच्याकडून शिकण्यासारखी आहे.जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामधे दैनंदीन ज्या छोट्या मोठ्या गोष्टी लागतात त्या प्रत्येक गोष्टीची निर्मिती टाटा समूहाने केलेली आहे. १०० पेक्षा अधिक कंपन्यांचा जो विस्तार झाला आहे त्यामध्ये टाटा मोटर्स सारखी जागतिक पातळीवरची प्रसिद्ध असणारी ऑटोमोबाईलची कंपनी असेल किंवा टीसीएस सारखी सॉफ्टवेअर क्षेत्रातील भारतातील नामांकित कंपनी असेल यांनी खऱ्या अर्थाने जागतिक पातळीवरती आपल्या दर्जेदार व महत्वपूर्ण सेवेने आपल्या कामाचा दर्जा उंचावलेला आहे. रतन टाटा यांच्या जीवनातील सर्वात मोठे बलस्थान काय असेल तर त्यांनी जपलेली मूल्ये आहेत.सर्वसामान्यांचा आणि लोककल्याणाचा समाजाच्या कल्याणाचा विचार हा सातत्याने त्यांच्या केंद्रस्थानी होता आणि म्हणूनच नैतिक मूल्यांना त्यांनी आयुष्यभर खूप महत्त्व दिलं. कोरोना सारख्या महामारी मध्ये देशाला त्यांनी खूप मोठी मदत केली. यावेळी रतन टाटा यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करून संकुलाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

# वर्तमान पत्रातून प्रसिद्धी




## संपादक मंडळ

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. लक्ष्मण घोलप | ज्येष्ठ मार्गदर्शक |
| २ | डॉ. शरद पारखे | संपादक |
| ३ | प्रा. प्रदीप गाडेकर | सह संपादक |
| ४ | प्रा. दिपक साबळे | सदस्य |
| ५ | प्रा. संगिता रिठे | सदस्य |
| ६ | प्रा. शुभम गडगे | सदस्य |
| ७ | प्रा. तृप्ती माटे | सदस्य |
| ८ | प्रा. गणेश नवले | सदस्य |




समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट (BE, ME, MBA, MCA)

समर्थ पॉलिटेक्निक | समर्थ लॉ कॉलेज (LLB 3 Years, LLB 5 Years)

समर्थ इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी | समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी

समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स | समर्थ इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग (GNM)

टोयोटा टेक्निकल एज्युकेशन प्रोग्राम | समर्थ व्यवसाय प्रशिक्षण केंद्र

समर्थ गुरुकुल ( CBSE School ) | समर्थ ज्युनिअर कॉलेज (सायन्स व कॉमर्स)

समर्थ इन्स्टिट्युट ऑफ पॅरामेडीकल सायन्स (ADMLT) | समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI)

समर्थ आयुर्वेदिक कॉलेज, हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर